सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. १७ डिसेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २५० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### भाजप १६० जागांवर लढणार

**मुंबई :** भाजप आणि शिवसेनेची मुंबई महापालिकेसाठी स्वतंत्र पहिली बैठक झाली असून महापालिकेसाठी भाजप जवळपास १६० जागांवर लढणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली. शिवसेनेला जवळपास ७०-८० जागा देण्यास तयार असल्याची सूत्रांची माहिती आहे. तसेच भाजपच्या कोट्यातून आरपीआयसाठी देखील २-३ जागा देण्यात येणार आहेत. माजी नगरसेवकांच्या जागांबाबत देखील निर्णय होणार असून मुस्लिम बहुल क्षेत्रात शिंदेंच्या शिवसेनेकडे तगडा उमेदवार असल्यास त्या देखील जागांवर चर्चा होणार आहे. तसेच पालिकेसाठी महायुतीच्या प्रचाराची रणनीतीवर देखील बैठकीत झाली आहे.

### पिंपरी-चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्र?

**पुणे :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादीसोबत युती न करण्याची घोषणा केली. यानंतर दोन्ही राष्ट्रवादींनी एकत्र येण्यासंदर्भात चाचपणी सुरु केली. पिंपरी चिंचवडमध्ये राष्ट्रवादीचे निवडणूक प्रमुख नाना काटे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या निवडणूक कोअर कमिटीचे सदस्य सुनील गव्हाणे या दोघांमध्ये बैठक पार पडली. मतविभाजनाचा फायदा भाजपाला होऊ नये यासाठी समविचारी पक्षांसोबत एकत्र येण्याबाबत सकारात्मक असल्याचं याबैठकीनंतर सांगण्यात आले.

### २९ महापालिकांवर महायुतीचाच भगवा फडकणार! : नवनाथ बन

**मुंबई :** आगामी महापालिका निवडणुकांचे मैदान महायुतीने विकास कामांच्या बळावर आधीच मारले आहे. मुंबईचा विकास महायुतीच करू शकते हा विश्वास मतदारांना आहे. मतदारांनी महायुतीचा साडेतीन वर्षांचा विकासाचा कारभार आणि गेल्या २५ वर्षांतील मुंबई महापालिकेतील कारभार पाहिलाय. उबाठा सरकारचा अडीच वर्षे घरी बसून केलेला खंडणी गोळा करण्याचा कारभार पाहिला आहे. त्यामुळे विकासासाठी मतदारांचा महायुतीलाच आशीर्वाद मिळेल, असा विश्वास नवनाथ बन यांनी मंगळवारी व्यक्त केला.

### नाशिक, नगर गारठलं! पारा घसरला

**पुणे :** राज्यभरात गेल्या काही दिवसांपासून तापमानाचा पारा घसरलाय. मराठवाड्यात, विदर्भात तापमान १० अंशाच्या खाली आल्याने नागरिकांना हुडहुडी भरली आहे. मध्य महाराष्ट्रातही हवेतील गारठा कायम आहे. गेल्या चार दिवसांपासून राज्यात थंडीची लाट होती. ही लाट काहीशी ओसरली असली तरी राज्यात गारठा कायम आहे. प्रादेशिक हवामान केंद्राच्या तापमानानुसार, नाशिक ८.८ अंश सेल्सिअस तर पुण्याचे तापमान ९.४ अंशांवर होते.

# भाजप-शिंदेंच्या पहिल्या फेरीत १४२ जागांचा तिढा सुटला



**मुंबई :** महापालिका निवडणुकांची घोषणा होताच निवडणुकांसाठी सदा सर्वकाळ तयार असणाऱ्या भारतीय जनता पक्षाने मित्रपक्ष शिवसेनेशी जागा वाटपाची बोलणी सुरू केली आहे. मंगळवारी झालेल्या बैठकीत अनेक जागांसंदर्भात सखोल चर्चा झाली. महायुतीच्या पहिल्याच फेरीत १४२ जागांचा तिढा सुटल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

मुंबई महापालिकेसाठी भारतीय जनता पक्ष आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना पक्षाच्या महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांची मुंबईत अत्यंत महत्त्वाची बैठक संपन्न झाली. जागावाटपासंदर्भातील वाटाघाटी तसेच प्रचाराच्या नियोजनाच्या अनुषंगाने उभय पक्षात सखोल चर्चाही झाल्याची माहिती आहे.

महायुतीच्या पहिल्याच फेरीत १४२ जागांचा तिढा सुटलेला असून शिवसेनेला ५२ तर भाजपच्या वाट्यास पहिल्या बैठकीत ९० जागांवर शिक्कामोर्तब करण्यात आले. १४२ जागांसंदर्भात कोणताही तिढा नसून तेथील उमेदवारही अंतिम झाल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ताब्यातील काही जागांवर भाजपचा दावा, मुस्लीम बहुल मतदार संघ शिवसेनेला सोडण्याची तयारी

ठाकरे गट आणि काँग्रेसच्या ताब्यातील जागांवर पुढील बैठकीत चर्चा होणे अपेक्षित आहे. तसेच उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ताब्यातील काही जागांवर भाजपने दावा सांगितला आहे. तर मुस्लीम बहुल मतदार संघ मात्र शिवसेनेला सोडण्याची भाजपची तयारी असल्याचे कळते.

उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या ताब्यातील बहुतांश जागा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला मिळणार आहे. जेणेकरून शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी थेटपणे लढत होऊन खरी शिवसेना कुणाची? याचा निर्णय मुंबईकरच घेतील, अशी यामागे रणनीती आहे. जवळपास ५५ माजी नगरसेवकांन ठाकरेंची साथ सोडून शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केल्याने शिंदे यांचे पारडेही जड मानले जात आहे. दरम्यान, सविस्तर चर्चेअंती भाजप आणि शिवसेनेने दावा केलेल्या जागांवर गुरुवारी निर्णय होणार असल्याची माहिती आहे.

# कर्ज फेडण्यासाठी शेतकऱ्याने विकली किडनी

**चंद्रपूर :** सावकारी कर्जाचा जाळ्यात अडकलेल्या या शेतकऱ्याला कर्ज फेडण्यासाठी स्वतःची किडनी विकण्याचा वेदनादाई प्रसंग ओढवला. रोशन सदाशिव कुडे असे या शेतकऱ्याचे नाव आहे. ते चंद्रपूर जिल्हातील मिंथुर गावातील रहिवाशी आहेत.

दुग्ध व्यवसायातून थोडी मिळकत होईल म्हणून त्यांनी दुधाळ गाई खरेदी केल्यात. यासाठी त्यांनी दोन सावकाराकडून ५०-५० हजार रुपये घेतले. येथेही त्यांना नशिबाने धोका दिला. खरेदी केलेल्या गाई मरण पावल्यात.त्यात शेतीही पिकेना. कर्जाचा डोंगर वाढत गेला. सावकार घरी येऊन नको ते बोलू लागलेत. कर्जातून मुक्त होण्यासाठी त्यांनी दोन एकर जागा विकली. ट्रॅक्टर आणि घरातील सामान विकले. मात्र कर्ज काही संपेना.

एक लाखाचे ७४ लाखावर गेले. शेवटी कर्ज घेतलेल्या एका सावकाराने किडनी विकण्याचा सल्ला दिला. एका एजंटने रोशन कुडे यांना कलकत्ता येथे नेले. कुडे यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर कंबोडिया येथे त्यांच्यावर शस्त्रक्रिया झाली आणि किडनी काढण्यात आली. ही किडनी कुडे यांनी आठ लाखाला विकली.

# शहर विकास आराखड्याच्या नावाखाली हिंदूंची शिवकालीन मंदिरे उद्ध्वस्त करण्याचा मनपाचा घाट : आ. संजय केनेकर

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेच्या २०२५ च्या शहर विकास आराखड्यातील गंभीर त्रुटींविरोधात आ. संजय केनेकर यांनी पत्रकार परिषद घेऊन तीव्र शब्दांत मनपा प्रशासनावर आरोप केले. हा विषय त्यांनी हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे उपस्थित केला होता. केवळ हिंदू धर्माच्या देव-देवतांची प्राचीन मंदिरे डी.पी. प्लॅनच्या नावाखाली उद्ध्वस्त करण्याचा घाट मनपा प्रशासनाने घातल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.



आ. केनेकर म्हणाले की, विकास आराखडा तयार करताना भूमी अभिलेख कार्यालयाचे सर्वे नकाशे, गाव नकाशे व प्रत्यक्ष अस्तित्वातील बांधकामांची योग्य सांगड घालण्यात आलेली नाही. परिणामी शहरातील १० ते १५ प्रमुख हिंदू मंदिरे, ग्रामदैवत श्री सस्थान गणपती मंदिर व ऐतिहासिक सुपारी हनुमान मंदिर डी.पी. रोडमध्ये बाधित होत आहेत. विशेष म्हणजे अतिक्रमणातून उभारलेल्या इतर धार्मिक स्थळांना संरक्षण दिले जाते, मात्र प्राचीन हिंदू मंदिरे लक्ष्य केली जात असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. यापूर्वीच्या १९७५, १९९१, २००१ व २०१२ च्या विकास आराखड्यांतील मंजूर रस्ते, लेआउट व परवानग्यांचा विचार न करता नवीन आराखडा लादण्यात आला आहे. यामुळे जनतेच्या भावना दुखावल्या जात आहेत.

या पत्रकार परिषदेला भाजपा जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, माजी महापौर बापू घडामोडे उपस्थित होते. या प्रकरणाची चौकशी निवृत्त उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून करावी व दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी केनेकर यांनी केली.

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
सोन्यासारखा आधार
टीजेएसबी सुवर्ण कर्जाची साथ

आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करा
व्याजदर 8.60%*
द.सा. पासून
*अटी व शर्ती लागू
www.tjsb.bank.in | ✆ : 022 - 48897222

# वनताराच्या विशेष भेटीदरम्यान अनंत अंबानीसह लिओनेल मेस्सी यांनी भारतीय पवित्र परंपरा आणि वन्यजीवांसोबत अविस्मरणीय क्षणांचा अनुभव घेतला



**जामनगर, भारत –** जागतिक फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी यांनी, अनंत अंबानी यांनी स्थापन केलेल्या वन्यजीव बचाव, पुनर्वसन आणि संवर्धन केंद्र, वनताराला विशेष भेट दिली. या केंद्रात, सर्व उपक्रमांची सुरुवात सनातन धर्मानुसार आशीर्वाद घेऊन केली जाते, जो निसर्गाप्रति आदर आणि सर्व सजीवांप्रति सन्मानावर भर देतो. मेस्सींच्या भेटीमध्ये या सांस्कृतिक मूल्यांचे प्रतिबिंब दिसले, कारण त्यांनी पारंपरिक हिंदू विधींमध्ये भाग घेतला, वन्यजीवांचे निरीक्षण केले आणि काळजीवाहू व संवर्धन संघांशी संवाद साधला. या भेटीदरम्यानच्या त्यांच्या कृतींमधून त्यांची नम्रता आणि मानवतावादी मूल्ये दिसून आली, ज्यासाठी ते जगभरात ओळखले जातात. तसेच, वन्यजीव संवर्धनाप्रति अनंत अंबानी यांच्या वचनबद्धतेमुळे त्यांच्यात असलेले उबदार नाते आणि मैत्री अधोरेखित झाली.

मेस्सी, त्यांचे इंटर मियामी संघाचे सहकारी लुईस सुआरेझ आणि रॉड्रिगो डी पॉल यांच्यासोबत, यांचे भव्य पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. यावेळी उत्साही लोकसंगीत, आशीर्वाद आणि शुद्धतेचे प्रतीक असलेल्या फुलांची उधळण आणि पारंपरिक आरती करण्यात आली. या फुटबॉल दिग्गजाने मंदिरातील महाआरतीमध्येही भाग घेतला, ज्यात अम्बे माता पूजा, गणेश पूजा, हनुमान पूजा आणि शिव अभिषेक यांचा समावेश होता. भारताच्या सर्व सजीवांप्रति आदराच्या शाश्वत मूल्यांनुसार, त्यांनी जागतिक शांतता आणि एकतेसाठी प्रार्थना केली.

स्वागत समारंभानंतर, मेस्सी यांनी वनताराच्या विशाल संवर्धन परिसंस्थेची मार्गदर्शित सफर केली, जिथे जगभरातील बचावलेले मोठे प्राणी, हत्ती, शाकाहारी प्राणी, सरपटणारे प्राणी आणि पाळीव लहान प्राण्यांचा अधिवास आहे. त्यांनी हरित ऊर्जा संकुल आणि जगातील सर्वात मोठ्या रिफायनरी संकुलालाही भेट दिली. तेथे त्यांनी या कार्यामागील व्याप्ती आणि दूरदृष्टी पाहून आश्चर्य व्यक्त केले.

सिंह, बिबट्या, वाघ आणि इतर धोक्यात असलेल्या प्रजातींसाठी असलेल्या काळजी केंद्रात, मेस्सीने समृद्ध, नैसर्गिक वातावरणात वाढणाऱ्या प्राण्यांशी संवाद साधला, ज्यापैकी अनेक प्राणी उत्सुकतेने त्याच्याजवळ आले. त्यानंतर त्याने शाकाहारी प्राणी काळजी केंद्र आणि सरपटणारे प्राणी काळजी केंद्राला भेट दिली, जिथे त्याने विशेष पशुवैद्यकीय काळजी, सानुकूलित पोषण, वर्तणूक प्रशिक्षण आणि पशुपालन प्रोटोकॉल अंतर्गत वाढणाऱ्या प्राण्यांचे निरीक्षण केले, जे वन्यजीव कल्याणामधील वनताराचे जागतिक नेतृत्व दर्शवते. या भेटीदरम्यान, त्याने मल्टी-स्पेशालिटी वन्यजीव रुग्णालयालाही भेट दिली. तेथे त्याने प्रत्यक्ष क्लिनिकल आणि शस्त्रक्रिया प्रक्रिया पाहिल्या आणि नंतर ओकापी, गेंडे, जिराफ आणि हत्तींना खाऊ घातले. जागतिक दृष्टिकोनातून, त्याने देशातील वन्यजीव काळजी आणि संवर्धनाला चालना देण्यासाठी भारताच्या पंतप्रधानांच्या वचनबद्धतेची प्रशंसा केली.

अनाथ आणि असुरक्षित तरुण प्राण्यांसाठी असलेल्या पालक काळजी केंद्रात, मेस्सीने त्यांच्या लवचीकतेच्या प्रवासांबद्दल जाणून घेतले. एका हृदयस्पर्शी कृतीत, अनंत अंबानी आणि राधिका अंबानी यांनी मिळून एका सिंहाच्या पिल्लाचे नाव 'लिओनेल' ठेवले, हे नाव आता आशा आणि सातत्य दर्शवते, जे फुटबॉलच्या या महान खेळाडूच्या सन्मानार्थ देण्यात आले आहे.

या दौऱ्याचा सर्वात महत्त्वाचा क्षण हत्ती काळजी केंद्रात आला. तेथे मेस्सी माणिकलालला भेटले. माणिकलाल हे एक बचावलेले हत्तीचे पिल्लू आहे, ज्याला दोन वर्षांपूर्वी त्याची आजारी आई प्रतिमासोबत लाकूडतोड उद्योगातील कठोर श्रमातून वाचवण्यात आले होते. केंद्रातील सर्वांची मने जिंकणाऱ्या एका क्षणी, मेस्सीने माणिकलालसोबत उत्स्फूर्तपणे फुटबॉल खेळण्याचा उपक्रम केला, ज्यामुळे खेळाची सार्वत्रिक भाषा दिसून आली. त्या पिल्लाने या उपक्रमाला उत्साहाने प्रतिसाद दिला आणि आपल्या उदयोन्मुख कौशल्यांचे प्रदर्शन करणाऱ्या खेळकर हालचाली केल्या, जो मेस्सीच्या भारत भेटीतील सर्वात अविस्मरणीय क्षणांपैकी एक ठरला.

अनंत अंबानी यांनी वनताराला भेट दिल्याबद्दल आणि प्राणी व मानवजातीसाठी निःस्वार्थपणे प्रेरणा दिल्याबद्दल त्यांचे आभार मानल्यावर, मेस्सीने स्पॅनिश भाषेत उत्तर दिले, 'वनतारा जे काही करते ते खरोखरच सुंदर आहे, प्राण्यांसाठीचे काम, त्यांना मिळणारी काळजी, ज्या प्रकारे त्यांची सुटका केली जाते आणि त्यांची काळजी घेतली जाते. हे खरोखरच प्रभावी आहे. आम्ही खूप चांगला वेळ घालवला, संपूर्ण वेळ आम्हाला खूप आरामदायी वाटले आणि हा एक असा अनुभव आहे जो तुमच्यासोबत कायम राहतो. या अर्थपूर्ण कार्याला प्रेरणा देण्यासाठी आणि पाठिंबा देण्यासाठी आम्ही नक्कीच पुन्हा भेट देऊ.'







भेटीच्या समारोपावेळी, मेस्सीने नारळ उत्सर्ग आणि मटका फोड या पारंपरिक विधींमध्ये भाग घेतला, जे सदिच्छा आणि शुभ सुरुवातीचे प्रतीक आहेत. शांतता आणि कल्याणासाठीच्या मंत्रोच्चाराने समारंभाची सांगता झाली, ज्यामुळे वंताराचे ध्येय आणि मेस्सीचा जागतिक वारसा यांना जोडणारी सामायिक मूल्ये अधोरेखित झाली. जगभरातील सामाजिक कार्य, शिक्षण, आरोग्यसेवा आणि मुलांच्या कल्याणासाठी समर्पित असलेल्या 'लिओ मेस्सी फाऊंडेशन'चे नेतृत्व करणाऱ्या मेस्सीने, 'वनतारा'च्या उद्देशाशी आपली सखोल सहमती व्यक्त केली आणि प्राण्यांसाठीच्या दयाळू, विज्ञान-आधारित सेवेच्या दृष्टिकोनाबद्दल कौतुक दर्शवले.

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूर मनपासाठी ३ लाख २१ हजार ३५४ मतदार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ डिसेंबर :** होऊ घातलेल्या लातूर शहर महानगरपालिकेच्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत एकूण ३ लाख २१ हजार ३५४ मतदार आपला मतदानाचा अधिकार बजावणार आहेत.

महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी सोमवार, दि. १५ डिसेंबर रोजी अंतिम मतदार यादी जाहीर करण्यात आली. या यादीनुसार शहरात ३ लाख २१ हजार ३५४ मतदार आहेत. लातूर शहर महानगरपालिकेत १८ प्रभागातून एकूण ७० नगरसेवक निवडून द्यायचे आहेत. शहरात सर्वात जास्त २० हजार ५९४ मतदार प्रभाग क्रमांक ८ मध्ये आहेत. तर सर्वात कमी १२ हजार ४७५ मतदार प्रभाग क्रमांक १८ मध्ये आहेत. मनपा निवडणुकीचीराजकीय पक्षांच्या उमेदवार-नेत्यांप्रमाणे सामान्य मतदारांनाही चांगलीच उत्सुकता लागून राहिली आहे.

नागरिकांना आपल्या अनेक नागरी समस्यांची सोडवणूक करण्याकरिता जायला मागच्या तीन वर्षांहून अधिक काळापासून लोकप्रतिनिधीच नाहीत. प्रशासन सामान्य नागरिकांच्या समस्यांकडे तेवढ्या पोटतिडकीने पाहत नसल्याचाकटू अनुभव नागरिकांनी या काळात भरपूर घेतला आहे. त्यामुळे एकदा मनपाची निवडणूक झाली की, आपल्या अडचणींची सोडवणूक करायला नगरसेवक उपलब्ध असतात, असा लोकांचा आजही विश्र्वास आहे.



# मनपा निवडणुकीची लगीनघाई सुरु

## – आरक्षित जागांवर इच्छुक उमेदवारांनी पुढे केल्या आपल्या 'गृहलक्ष्मी'
## – चुरशीच्या होणाऱ्या या निवडणुकीवर अनेकांचा 'डोळा'

**त.भा. वृत्तसेवा/श्रीधर स्वामी**

**लातूर, १६ डिसेंबर :** लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीची लगीन-घाई अखेर सुरु झाली. होऊ घातलेल्या या निवडणुकीसाठी अनेक महिन्यांपासून नव्हे तर अनेक वर्षांपासून तयारीला लागलेल्या अनेक इच्छुक उमेदवारांचे प्रभाग आरक्षित झाल्याने त्यांनी हार न मानता आपल्याऐवजी आपल्या 'गृहलक्ष्मी'ला पुढे करण्याचा निर्णय घेतल्याचे एकंदर परिस्थितीवरून दिसून येत आहे. राज्यातील चुरशीच्या होणाऱ्या काही मोजक्या महापालिकांमध्ये लातू-रचाही समावेश असल्याने या निवडणुकीवर अनेकांचा 'डोळा' असल्याचे निदर्शनास येत आहे.

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम सोमवारी निवडणूक विभागाने घोषित केला. दि. ३१ जानेवारी २०२६ पर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे स्पष्ट निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने या निवडणुका आता कोणत्याही परिस्थितीत पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगासह सर्वच प्रमुख राजकीय पक्षही कामाला लागले आहेत.

लातूर मनपाची मुदत संपून जवळपास तीन साडेतीन वर्षांचा कालावधी उलटून गेला आहे. त्यामुळे या निवडणुकांची तयारी अनेक इच्छुक-संभाव्य नगरसेवकांनी फार पूर्वीपासून सुरु केली होती. नागरिकांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी पुढाकार घेण्याबरोबरच प्रभागात-वॉर्डात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करणे, महिला मतदारांची मते मिळवण्यासाठी महिलांसाठीचे विविध उपक्रम प्राध्यानाने आयोजित करणे यासारख्या गोष्टी शहरा-तील अनेक प्रभागात आतापर्यंत केल्या गेल्याचे पाहण्यात आले आहेच. मात्र, अचानकपणे आरक्षणात प्रभाग महिला गटांना सुटल्याने इच्छुकांचा काहीक्षण भ्रमनिरास झाला. परंतु दुसऱ्याच क्षणाला त्यांनी आरक्षित जागेवर आपण नाही तर नाही, आपल्या अर्धांगिनीला 'गृहलक्ष्मी' ला पुढे करण्याच्या तयारीला लागले आहेत. यामध्ये तूर्तास आपण कोणाही अशा इच्छुकांच्या नावाचा उल्लेख करणे हेतुतः टाळत आहोत. यामध्ये माजी उपमहापौरांसह अनेक जण सामील आ-हेत, एवढे आम्ही सांगू इच्छितो.

लातूर शहर महानगरपालिका निवडणूक दोन्ही माजी मंत्री काँग्रेसचे अमित देशमुख आणि भाजपचे माजी मंत्री संभाजी पाटील निलंगेकर यांच्यासाठी अत्यंत प्रतिष्ठेची आहे. मागच्या मनपात संभाजी पाटलांच्या नेतृत्वात भाजप-ने पहिल्यांदा मनपावर ताबा मिळवला होता. या निवडणुकीतही त्याची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्न संभाजी पाटील यांचा असणार आहे. तर मागच्या वेळेला झाले ते आता होऊ द्यायचे नाही असा चंग आ. अमित देशमुख यांनी बांधला आहे. त्यामुळे ही निवडणूक अपेक्षेपेक्षाही अतिशय चुरशीची होण्याचे संकेत मिळत आहेत. त्यातच मावळत्या पालिकेतील महापौर – उपमहापौर या दोघांनीही आता अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.

त्यामुळे मनपा निवडणुकीत खिजगिणतीतही नसलेली अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आता आव्हानात्मकरित्या पुढे येण्याची चिन्हे दिसत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती एकत्रित लढणार असल्याचे सांगण्यात आल्याने भाजपकडून आपल्याला हवे असलेले प्रभाग पदरात पाडून घेण्याचे काम राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केलेल्या या नूतन पदाधिकाऱ्यांना करावे लागणार आहे.

महायुतीकडून स्थानिक स्वराज्यच्या निवडणुका एकत्रित लढविण्याचे संकेत देण्यात आले असले तरी प्रत्यक्षात त्या – त्या ठिकाणच्या संबंधितांच्या ताकदीवर महायुती की एकट्याने लढायचे याचा निर्णय घेतला जाईल, असेही दिसून येत आहे.

महाविकास आघाडीही एकत्रित लढणार की प्रत्येक घटक पक्ष स्वतंत्रपणे याकडेही सगळ्यांचे लक्ष लागून राहिले आहे. या निवडणुकीत लातूर मनपात नेहमीच्या चर्चित चेहऱ्यांऐवजी त्यांच्या ' गृहलक्ष्मी' सभागृहात अवतीर्ण होण्याची चिन्हे दिसत आहेत.

अर्थात आता हे सगळे मतदार राजाच्या हातात आहे. मतदारही आपल्या प्रभागाच्या – परिसराच्या समस्या सक्षमपणे सोडविण्यास कोण खंबीर आहे, हे पाहूनच आपल्या 'मता'चे 'दान' कोणाच्या पारड्यात टाकायचे याचा निर्णय घेणार आहेत, हे काही वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.



## कै.शिवराज पाटील चाकुरकरांना काशी विश्वेश्वर मंदिरात श्रद्धांजली

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ डिसेंबर :** विशाल नगर लातूर येथील काशी विश्वेश्वर मंदीर सभागृहात वीरशैव लिंगायत समाज बांधवाच्या व शिवभक्तांच्या वतीने देशाचे माजी गृहमंत्री कै.शिवराज पाटील चाकुरकर यांना भाव-पूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

शिवराज पाटील यांचे विशाल नगर लातूर येथील काशी विश्र्वेश्र्वर मंदीर उभारणी व विद्यार्थी वसतिगृह उभारणीमध्ये मोलाचे योगदान लाभले आहे. देवस्थानच्या वतीने त्यांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी काशी विश्र्वेश्र्वर मंदीर व्यवस्था प्रमुख वीरशैव लिंगायत समाजाचे मन्मथअप्पा काशीनाथअप्पा पंचाक्षरी,

ॲड गंगाधर हामणे, बसवंतअप्पा भरडे, बाबुराव वडगावे, जगन्नाथ कोळंबे, प्रा. करबसप्पा पोपडे, ओमकार पंचाक्षरी, बालाजी पिंपळे, ओमप्रकाश झुरळे, मल्लिकार्जुन मेंगशेट्टे, किशोर शेटे, खराडे गुरुजी, भुसने गुरुजी, शरणप्पा अंबुलगे गुरुजी, त्र्यंबक गुरुनाथ स्वामी, ब्रम्हानंद स्वामी साकोळकर, अनिल स्वामी हरंगुळकर, बसवेश्वर स्वामी कोकलगे, शरणप्पा दावणगिरे, शिवकुमार संग्राम स्वामी. महिला भगिनी वांगसकर, उपासे, स्वामी, बाळापुरे, चव्हाण, माने, ऊळागड्डे, कोरे यांच्यासह अनेक महिला पुरुष उपस्थित होते.



## तुळजाई प्रतिष्ठान व सोहम फाऊंडेशनच्या वतीने महिलांना शिलाई मशीनचे वाटप

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ डिसेंबर :** महिलांच्या सबलीकरणासाठी तसेच त्यांना आर्थिक दृष्टया सक्षम करण्याच्या उद्देशाने तुळजाई प्रतिष्ठान व सोहम फाऊंडेशन, धाराशिवच्या वतीने नुकतेच लातूर तालुक्यातील चिंचोलीराव वाडी येथील महिलांना अल्पदरात शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी चिंचोलीराव वाडीचे सरपंच दत्ता फुलचंद सप्ताळ, उपसरपंच अनुसया व्यंकट पिंपरे, ग्रामविकास अधिकारी आर.के. मठपती, अरविंद दिवशे, तांबोळी मॅडम, प्रतिभा मॅडम फाऊंडेशनचे अध्यक्ष मदन कावळे, राघव गडकर, जिल्हा समन्वयक कल्याणी हाके आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

तुळजाई प्रतिष्ठान व सोहम फाऊंडेशनच्या वतीने लातूर जिल्ह्यातील महिलांना सक्षम करण्याच्या उद्देशाने अशा प्रकारचे उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचबरोबर गरजू विद्यार्थ्यांनाही लॅपटॉपसह अन्य आवश्यक साहित्य अल्पदरात वितरित केले जाणार आहे. त्यासाठीही संस्थेच्या वतीने सर्वतोपरी प्रयत्न आणि सहकार्य केले जात आहे. ही संस्था महिला सबलीकरण, आरोग्य, कृषी, पर्यावरण या विषयावही अग्रक्रमाने काम करते. संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती मदन कावळे यांनी दिली. या उपक्रमाबद्दल बोलताना सरपंच दत्ता सप्ताळ यांनी समाधान व्यक्त करून अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील महिलांना खऱ्या अर्थाने सक्षम करणे शक्य होणार असल्याचे सांगितले.

# लघुपटासारख्या कलाकृतींमधून प्रबोधन महत्वाचे : तांबे

## दयानंद सभागृहात तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय शॉर्ट फिल्म फेस्टिवलचे उद्घाटन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ डिसेंबर :** लघुपटासारख्या कलाकृतींमधून होणारे समाज प्रबोधन अतिशय महत्वाचे असल्याचे प्रतिपादन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी केले.

दयानंद शिक्षण संस्था व अभिजात फिल्म सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने दयानंद सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय शॉर्ट फिल्म फेस्टिवलच्या उद्घाटनप्रसंगी लातू-रचे पोलिस अधीक्षक अमोल तांबे प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमास दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमन लाहोटी, सचिव रमेश बियाणी, शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड तसेच दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मानिकर, कार्यक्रमाचे प्रायोजक श्री. आदित्य सोनवणे (हॉटेल कन्हैया), दयानंद कला महाविद्यालयाच्या उपप्रा-चार्य डॉ. अंजली जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना अमोल तांबे म्हणाले की, पूर्वी फिल्मनिर्मिती ही काही मोजक्या कुटुंबांपुरती मर्यादित होती; मात्र आज प्रत्येकाला संधी उपलब्ध आहे. समाजातील छोट्या-छोट्या विषयांवर आधारित फिल्म्समधून जनजागृती व समाजप्रबोधन करता येते. विविध गुन्हे-गारी घटनांवर आधारित चित्रपट तयार केल्यास समाजात सकारात्मक बदल घडू शकतो, असेही त्यांनी नमूद केले.

पोलिस अधीक्षक अमोल तांबे यांचे स्वागत कार्यक्रमाचे प्रायोजक आदित्य सोनवणे यांनी केले. दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमनजी लाहोटी यांचे स्वागत अभिजात फिल्म सोसायटीचे उपाध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी, तर सचिव रमेश बियाणी यांचे स्वागत दयानंद कला महाविद्यालयाच्या निमेशन विभाग प्रमुख व अभिजात फिल्म सोसायटी समिती सदस्य डॉ. दुर्गा शर्मा यांनी केले.

या फिल्म फेस्टिवलमध्ये १२ वेगवेगळ्या देशांतून २५० शॉर्ट फिल्म्स दाखल झाल्या असून त्यामध्ये शॉर्ट फिल्म, डॉक्युमेंटरी, व्हिडिओ साँग व निमेशन अशा प्रकारांचा समावेश आहे. त्यापैकी निवडक १०० फिल्म्स तीन दिवसांत प्रदर्शित करण्यात येणार आहेत. या फिल्म्सचे परीक्षण जागतिक दर्जाच्या परीक्षकांमार्फत करण्यात आले असून यामध्ये सुप्रसिद्ध फिल्म दिग्दर्शक संतोष पठारे व फिल्म निर्देशक नीलेश कुंजीर यांचा समावेश आहे. निवड झालेल्या उत्कृष्ट फिल्म्सना फेस्टिवलच्या शेवटच्या दिवशी पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत.

स्थानिक कलाकारांना व्यासपीठ मिळावे या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या फेस्टिवलमध्ये स्थानिक आठ फिल्ममेकरांनी सहभाग घेतला आहे. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डॉ. विश्र्वास शेंबेकर यांनी अभिजात फिल्म सोसायटीची माहिती देत फिल्म फेस्टिवल आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. पुणे व मुंबईप्रमाणे लातूरमध्येही फिल्म फेस्टिवलचे वातावरण निर्माण करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमन लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांनी फेस्टिवलसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आभार अभिजात फिल्म सोसायटीचे सचिव डॉ. स्वप्निल देशमुख यांनी मानले.




हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभिजात फिल्म सोसायटीचे अध्यक्ष जितेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. स्वप्निल देशमुख, धनंजय कुलकर्णी, डॉ. दुर्गा शर्मा, आदित्य कुलकर्णी, प्रथमेश जाधव, अभिषेक बुचके व डॉ. श्रीनिवास कुलकर्णी यांनी यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. दयानंद कला महाविद्यालयातील निमेशन विभागातील विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून मोलाची भूमिका बजावली.

# जागतिक ध्यान दिनी शंभरी गाठलेल्या लातूरच्या ऐतिहासिक गंजगोलाईत सामुदायिक ध्यान उपक्रम

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ डिसेंबर :** संयुक्त राष्ट्राने २१ डिसेंबर हा 'जागतिक ध्यान दिवस' म्हणून घोषित केल्याच्या पार्श्वभूमीवर लातूरच्या गंजगोलाई परिसरात भव्य सामुदायिक ध्यान उपक्रम राबविला जात आहे. रविवार, २१ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता गंजगोलाई परिसरात भव्य सामुदायिक ध्यान उपक्रमाचे आयोजन करण्यात आलं आहे. यामुळे गंजगोलाईचा इतिहास, संस्कृती आणि शांततेचा संदेश जगभर पोहोचणार असून या उपक्रमात लातूरकरांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचा आवाहन करण्यात आलं आहे. या उपक्रमामुळे लातूरची ऐतिहासिक ओळख जागतिक स्तरावर अधोरेखित होणार आहे.







गंजगोलाईच्या मध्यभागी एकत्र येणाऱ्या १६ रस्त्यांवरून विविध सामाजिक संस्था, संघटना तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आ-हेत. विशेष बाब म्हणजे या १६ विविध रस्त्यावर ध्यानासाठी बसणाऱ्यांची जबाबदारी १६ विविध संघटनांनी घेतलेली आहे. इतिहास, संस्कृती आणि शांततेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमामुळे संपूर्ण परिसर ध्यानमय होणार आहे. यामुळे मानवी मनाला शांतीचा मार्ग दाखविणाऱ्या ध्यानसाधनेच्या माध्यमातून लातूरची नवी ओळख जगासमोर मांडली जात आहे. या ध्यान साधनेतून शारीरिक व मानसिक स्वास्थ्य, सामाजिक ऐक्य, तणावमुक्त जीवन, अहिंसामुक्त परिसर याच्यासाठी ह्या ध्यान सत्राचे आयोजन करण्यात आ-लेले आहे.

गंजगोलाई ही केवळ बाजारपेठ नसून, शहर रचनेचा एक अद्वितीय नमुना आहे. शंभर वर्षांपूर्वी स्थानिक व्यापाऱ्यांच्या दूरदृष्टीतून साकारलेली ही गोलाकार बाजारपेठ आज जागतिक ध्यान दिनाच्या निमित्ताने पुन्हा एकदा चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे. या उपक्रमामुळे ध्यान साधनेचा अनोखा 'लातूर पॅटर्न' निर्माण होत असून, लातूरकरांची एकजूट आणि सांस्कृतिक वारसाही अधोरेखित होणार आहे.

जागतिक ध्यान दिनानिमित्त आयोजित या सामुदायिक ध्यान उपक्रमात समाजातील सर्व घटकांचा सहभाग नोंदविला जात असून, गंजगोलाईचा ऐतिहासिक वारसा आणि लातूरची शांतताप्रिय संस्कृती जागतिक पातळी-वर पोहोचत आहे. त्यामुळे २१ डिसेंबर रोजी मोठ्या संख्येने प्रत्येक लातूरकराने सामुदायिक ध्यान उपक्रमात हजेरी ला-वून ऐतिहासिक गंजगोलाईचा जागतिक नावलौकिक वाढवू या, आणि लातूरच्या संस्कृतीचा अभिमान अधिक तेजाने जगभर पसरवू या असे आवाहन केलं आहे.

## 'आपले न्यायालय- आपली जबाबदारी' उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ डिसेंबर :**लातूरचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भारूका यांच्या विशेष प्रयत्नांतून राबविण्यात आलेल्या 'आपले न्यायालय-आपली जबाबदारी' उपक्रमास लातुरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमाच्या माध्यमांतून अनेक प्रलंबित कामांचा निपटारा करण्यात आला.

अपुऱ्या मनुष्यबळामुळे न्यायालयीन प्रलंबित प्रकरणांची संख्या दिवसेंदिवस वाढत जात आहे. परिणामतः लोकांना न्याय वेळेत मिळणे अवघड होते. त्यामुळे आपोआपच कामकाजाचा ताणही वाढतो. ही बाब लक्षात घेऊन न्या. संजय भारूका यांनी हा अनोखा उपक्रम राबविला. दि. १३ डिसेंबर रोजी लोक अदालतीच्या दिवशी सदर उपक्रम राबविला गेला. या उपक्रमाला न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी अत्यंत चांगला प्रतिसाद दिला. न्या. संजय भारूका यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना सामान्य लोकांना न्यायालयीन कामकाज, कर्मचाऱ्यांना येणाऱ्या अडचणींची फारशी कल्पना नसते. न्यायालयीन कर्मचाऱ्यांनीही त्यांना येणाऱ्या अडचणी समस्या आपल्या वरिष्ठांशी शेअर कराव्यात, त्यांनी आपल्या अडचणी सांगितल्या तर त्यावर योग्य तो पर्याय निवडणे सोपे होऊन न्यायप्रक्रियाही गतिमान करणे सुलभ होऊ शकते, असे सांगितले. या उपक्रमाबद्दल न्यायालयीन कर्मचाऱ्यांनीही हा अभिनव उपक्रम यशस्वी झाल्याच्या भावना बोलून दाखविल्या. या उपक्रमात न्या. एस.टी. त्रिपाठी, एस.व्ही. जाधव, व्ही.एस. मोरे, पी.पी. केस्तीकर, व्यंकटेश गिरवलकर यांसह अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला.

## थोडक्यात...

### एअरबीएनबीसोबत लोल्लापालूझा इंडिया २०२६ चा अनुभव अधिक रंगणार




**छत्रपती संभाजीनगर :** मुंबईतील महालक्ष्मी रेसकोर्स येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या लोल्लापालूझा इंडिया महोत्सवात एअरबीएनबी खास अनुभवांच्या माध्यमातून चाहत्यांचा उत्साह द्विगुणित करणार आहे. जागतिक लाईव्ह म्युझिक पार्टनरशिपचा भाग म्हणून एअरबीएनबी बॅकस्टेज टूर, कलाकारांशी संवाद सत्रे आणि पडद्यामागील घडामोडींचा प्रत्यक्ष अनुभव देणार आहे. या उपक्रमांतर्गत गायक-गीतकार अंकुर तिवारी यांच्यासोबत खास बॅकस्टेज अनुभव, ओएएफएफ आणि सवेरा यांच्यासोबत स्टेजमागील सर्जनशील प्रक्रिया, तसेच लोल्लापालूझा इंडिया इनसाइडर राशी संघवी यांच्या मार्गदर्शनाखाली महोत्सव निर्मितीची माहिती मिळणार आहे. बुकिंग १५ डिसेंबरपासून 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' तत्त्वावर सुरू होईल. महोत्सव लाँग वीकेंडमध्ये होत असल्याने एअरबीएनबी मुंबईतील उत्साही परिसरात राहण्याची सोय उपलब्ध करून देणार आहे.

### माजी जि.प. अध्यक्ष रंगनाथ काळे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना वह्याचे वाटप



**सोयगाव :** सोयगाव येथील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते तथा अजिठा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा जिल्हा परीषदेचे माजी अध्यक्ष रंगनाथ काळे याच्या ७० व्या वाढदिवसा निमित्ताने जिल्हा परीषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथील ३५६ विद्यार्थ्यांना वह्याचे वाटप करण्यात आले. यावेळी अध्यक्ष म्हणून जरंडी येथील प्रगतीशिल शेतकरी श्रीराम पाटील हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सोयगाव येथील माजी सरपंच सुभाष चौधरी हे होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष दिपक देशमुख, शहराध्यक्ष रवींद्र काळे, काँग्रेस तालुकाध्यक्ष राजेंद्र काळे, शिव-सेना तालुकाध्यक्ष दिलीप मचे, उपतालुकाप्रमुख सूर्यभान गवळी, रवींद्र काटोले, कृष्णा जूनघुरे पाटील, मुन्ना ढगे, मंगेश सोहनी, मयुर मनगटे, अकुश पगारे, प्रा.कमलेश काळे, निलेश पाटील, ज्ञानेश्वर एलीस, किरणकुमार पाटील याची प्रमुख उपस्थिती होती.

### विद्यार्थ्यांनी घेतला गटविकास अधिकारी कार्यालयातील कामकाजाचा आढावा

**सोयगाव :** गटविकास अधिकारी यांच्यासह सहाय्यक घटकाचा अधिकारी यांनी केले. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथील सातवीतील विद्यार्थ्यांनी सोयगाव येथील गटविकास अधिकारी कार्यालास क्षेत्रभेट घेऊन कार्यालया मार्फत सुरु असलेल्या कामकाजाचा आढावा घेतला. तसेच यावेळी विद्यार्थ्यांनी गटविकास अधिकारी कार्यालयातील प्रत्येक टेबल जाऊन संबंधीत अधिकारी यांच्या कडून त्याच्या कार्याची माहीती जानून घेतली. यावेळी गटविकास अधिकारी कार्यालयातील सर्व कर्मचारी, भिकन पाटील, मुख्याध्यापक किरणकुमार पाटील, वर्गशिक्षिका मंगला बोरसे, वर्गशिक्षक रामचंद्र महाकाळ, बिलाल बागवान याची उपस्थिती होती.

# स्मशानभूमी जागेसाठी गावकऱ्यांचा जलसमाधीचा पवित्रा

**तभा वृत्तसेवा**

**कन्नड, दि.१६ डिसेंबर :** तालुक्यातील रामनगर पळशी बु.येथील गावकऱ्यांनी स्मशानभूमी आणि गावातील जागेसाठी दि.१५ रोजी सकाळी ९ वाजता जलसमाधी आंदोलन केले आहे.

रामनगर पळशी बु. ग्रामपंचायतला प्रशासकीय अधिकारी के.पी. कुलकर्णी हे असून आंदोलनस्थळी ते न आल्याने काही काळ वातावरण चांगलेच तापले होते. ग्रामस्थांनी थेट आरोप केले ते गावात येतच नाही त्यामुळे गावातील अडचणीमध्ये वाढ झाली आहे





रामनगर पळशी बु.येथील गावकऱ्यांनी दि. ८ डिसेंबर रोजी गटविकास अधिकारी यांना जलसमाधी आंदोलनाचे निवेदन दिले त्यात म्हटले होते की, रामनगर हे गाव पुनर्वसीत असून अंजना-पळशी मध्यम प्रकल्पात जमिनी संपादित झाली असून या गावकऱ्यांचे कागदोपत्री ६२ एकर मध्ये पुनर्वसन करण्यात आले होते पण प्रत्यक्षात त्यांना गावात जाण्यासाठी मुख्य रस्ता, स्मशानभूमी, दफनभूमी, नसल्याने मिळेल त्या जागेवर अंत्यसंस्कार करण्यात येत असल्याने गावकऱ्यांनी जलसमाधी आंदोलनाचा पवित्रा घेतला होता.

यावेळी पंचायत समिती विभागाचे हरिओम कोलमवाड,मंडळ अधिकारी अल्का पटरे, तलाठी सचिन मोरे, लघुपाटबंधारे विभागाचे आर.आर. डोंगरे आदी कर्मचारी उपस्थित होते. दुपारी २ वाजेच्या सुमारास प्रभारी तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे यांनी मध्यस्थी करत उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांनी भ्रमणध्वनी वरून आंदोलनकर्त्यांची समजूत काढत दि.२४ डिसेंबर रोजी बैठक घेऊन उपयोजना करण्याचे आश्वासन दिले त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले

माजी उपसरपंच कारभारी खुर्दे, रघुनाथ गावंडे, रामहरी सोनवणे, कैलास खुर्दे, आकाश शेळके, बाळू निकम, रमेश गायकवाड आदी ग्रामस्थांनी आंदोलन केले आहे.

# अंजना-पूर्णा नदीपात्रातून अवैध वाळू उपसा

**तभा वृत्तसेवा**

**सिल्लोड, दि.१६ डिसेंबर :** सिल्लोड (वा.) तालुक्यातील उपळी परिसरात अंजना नदीपात्रातून व दिडगाव येथील पुर्णा नदीपात्रातून जेसीबी मशीनच्या सहाय्याने अवैध वाळू उपसा करण्यात येत आहे.

उपळी व दिडगाव गावाच्या नदीपात्रातून दिवसा व रात्रीच्या वेळेस दररोज हजारो ब्रास वाळू अवैधरित्या बाहेर काढून तो ट्रॅक्टरद्वारे इतर ठिकाणी वाहून नेला जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. परिसरातील विविध ठिकाणी वाळू माफियांनी मोठमोठे वाळू साठे करून ठेवले असल्याचेही समोर येत आहे. महसूल व पोलिस अधिकारी यांच्या दुर्लक्षामुळे कारवाया निर्भयपणे सुरू असल्याची चर्चा स्थानिकांमध्ये आहे.

दिवसा ढवळ्या सुरू असलेल्या या धाडसी वाळू चोरीमुळे नदीचा नैसर्गिक समतोल कोलमडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या वाळू उपशामुळे परिसरातील पाणी झपाट्याने खालावत असल्याचे स्थानिक नागरिकांनी



सांगितले.

या सर्व पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असून महसूल विभाग व पोलिस प्रशासनाकडून तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी वारंवार होत आहे. अवैध वाळू उपशावर कडक नियंत्रण न आणल्यास पुढील काळात परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे.

नदीची दिशा बदलण्याचा धोका

महत्त्वाचे म्हणजे, परिसरातील एकाही वाळूपट्ट्याचा अधिकृत लिलाव झालेला नाही. तरीही सर्रास उपसा सुरू आहे. या अनियंत्रित उत्खननामुळे नदीपात्रात मोठमोठे खड्डे पडून नदीची दिशा बदलण्याचा आणि भविष्यातील भीषण पाणीटंचाईचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.



# एमजीएममध्ये 'अध्यापक विकास'चे उद्घाटन संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि.१६ :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या यांत्रिक अभियांत्रिकी विभाग आणि आयशेयर छत्रपती संभाजीनगर चाप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय अध्यापक विकास कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत विनोबा भावे सभागृहात पार पडले. या कार्यक्रमाची संकल्पना 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स फॉर स्मार्ट रोबोटिक्स अँड ऑटोमेशन' अशी आहे.

यावेळी कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, आयशेयरचे माजी अध्यक्ष राजेंद्र करमाळकर, लिबर इंडिया अप्लायन्सेसचे गणेश फिरके, एबीबी ग्लोबल इंडस्ट्रीजचे अभिषेक पतंगे, संचालिका डॉ. परमिंदर कौर, प्राध्यापक व सर्व संबंधित उपस्थित होते.

यावेळी बोलताना एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ म्हणाले, एआयच्या मदतीने उद्योगातील निर्णयप्रक्रिया अधिक परिणामकारक होते, शाश्वत विकास आणि ऊर्जा बचत ही सध्याची गरज आहे. एफडीपीमधील केस-बेस्ड प्रोजेक्ट चर्चेमुळे प्राध्यापकांच्या सर्जनशीलतेला चालना मिळते. उद्योगांमध्ये रोबोटिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्या साहाय्याने ऑप्टिमायझेशन कसे साधता येते, यावरही विचार करणे आवश्यक आहे.

तीन दिवस चालणाऱ्या या अध्यापक विकास कार्यक्रमात स्मार्ट रोबोटिक्स, ऑटोमेशन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, ऊर्जा कार्यक्षमता आणि शाश्वत तंत्रज्ञान या विषयांवर तज्ञाकडून सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

# मोटोरोलाकडून एज ७० केला लाँच

**मुंबई :** मोटोरोला या मोबाइल तंत्रज्ञान व नाविन्यतेमधील जागतिक अग्रणी आणि भारतातील आघाडीच्या एआय स्मार्टफोन ब्रँडने आज मोटोरोला एज ७० च्या लाँचसह सर्वात सडपातळ आणि अद्वितीय स्मार्टफोनचे अनावरण केली. अल्ट्रा-स्लिम अभियांत्रिकीला नव्या उंचीवर घेऊन जाणाऱ्या या डिवाईसमध्ये अविश्र्वसनीयरित्या स्लीक ५.९९ मिमी एअरक्राफ्ट-ग्रेड ॲल्युमिनिअम डिझाइन, विशाल ५००० एमएएच बॅटरी आहे, जी जवळपास ४० तासांपर्यंत कार्यरत राहते, तसेच फास्ट वायर्ड व वायरलेस चार्जिंग, सेगमेंटमधील सर्वात प्रगत ट्रिपल ५० मेगापिक्सल एआय कॅमेऱ्यांसह सर्व लेन्सेसमध्ये ४के ६०एफपीएस रेकॉर्डिंग आहे. कार्यक्षमता व उत्कृष्टतेला नव्या उंचीवर घेऊन जात मोटोरोला एज ७० स्नॅपड्रॅगनएँ ७ जेन ४ ची शक्ती असलेला जगातील पहिला अल्ट्रा-थिन स्मार्टफोन आहे, जो मोटो एआय २.०, कॉपीलॉट, गुगल जेमिनी आणि परप्लेक्सिटीसह अद्वितीय मल्टी-प्लॅटफॉर्म एआय देतो.

# धनंजय उर्फ बब्रुवान!

**सं**भाजीनगरला देवगिरी तरुण भारत मध्ये ज्याच्यासोबत तब्बल ८- ९ वर्षे सोबत काम करण्याचा योग आला असा पत्रकार मित्र आणि साहित्यिक धनंजय चिंचोलीकर यापुढे भेटणार नाही ही कल्पनाच वेदनादायी आहे. गेल्या काही काळापासून त्याच्या बाबतच्या येणाऱ्या बातम्या चिंता वाढवणाऱ्याच होत्या.अखेर या चिंतांना आज पूर्णविराम मिळाला. एक उत्तम विनोदी लेखक, अत्यंत परिश्रमातून विकसित केलेली लेखनशैली, कलात्मकता, अचूक निरीक्षण, अचूक शब्द निवड, कलात्मक हस्ताक्षर असे अनेक लेखन पैलू जोपासत धनंजयने मराठी साहित्य विश्र्वात एक वेगळे स्थान निर्माण केले होते. आपल्या अफाट निरीक्षण आणि बुद्धिमत्तेच्या क्षमतेवर त्याने केवळ स्वतःची लेखनशैलीच नाही तर एक गावरान प्लस इंग्रजी अशी संमिश्र भाषाच निर्माण केली होती. स्वतःच जन्मदाता असलेल्या या भाषेत त्याचं लिखाण अक्षरशः अफलातून होतं.

धनंजयशी भावबंध जुळले ते संभाजीनगरला देवगिरी तरुण भारतमध्ये. तसा तो एका वेगळ्या विचार परिवारातून आलेला होता. सुरुवातीला अबोल, शिष्ट, बोलण्यासाठी कंजुषपणा करणारा वाटावा असे एकूण त्याचं व्यक्तिमत्व आणि बोलणे चालणे... मात्र काही काळातच संघ विचारांचा प्रभाव असलेल्या या दैनिकात तो एवढा रुळला की पुढली दहा-बारा वर्ष हा आपल्याच परिवारातील आहे असे वाटावे एवढे अंतरबाह्य परिवर्तन त्याने स्वतःमध्ये घडवून आणले होते.

देवगिरी तरुण भारतच्या अक्षर पुरवणीचे काम करत असताना त्याच्या लेखकाला देखील एक मोठे व्यासपीठ प्राप्त झाले. ही पुरवणी अधिक व्यापक करण्यात त्याचा खूप मोठा वाटा होता. याच अक्षर पुरवणी मध्ये वेगवेगळे प्रयोग करत त्याने या पुरवणीचा एक वेगळा वाचक तयार करण्यात खूप मोठे यश मिळवले होते. अक्षर पुरवणीत त्याने लिहिलेले अस्सल ग्रामीण मराठवाडी प्लस इंग्रजी अशा संमिश्र भाषेत एक नियमित सदर सुरू केले. त्यातूनच बब्रुवान रुद्रकंठावर या नावाचा साहित्य विश्वातील एक नव्या दमाचा लेखक तयार झाला. मात्र याच नावाने धनंजयला साहित्य विश्वात एक वेगळी ओळखही मिळवून दिली. त्याच्या 'पुन्यांदा चबढब' ला जेव्हा साहित्य संस्कृती मंडळाचा पुरस्कार मिळाला तेव्हा खूप जणांची कोण हा बब्रुवान? अशी प्रतिक्रिया होती. मात्र हा बब्रुवान म्हणजे आपला धनंजय आहे हे समजायला देखील त्याच्या परिचितांना बराच काळ जावा लागला होता.



याच अक्षर पुरवणीत धनंजयने एक वेगळाच अफलातून प्रयोग केला तो न-मुलाखतीचा! मान्यवर व्यक्तींची प्रत्यक्ष मुलाखत घेत असल्याची कल्पना करून न- मुलाखतीचा यापूर्वी कधीही न केलेला एक वेगळाच लेखन प्रकार त्याच्या कल्पनाशक्तीतून अस्तित्वात आला. अटलबिहारी वाजपेयी यांच्यापासून बाळासाहेब ठाकरेंपर्यंत अशा अनेक मान्यवर व्यक्तींच्या न मुलाखती त्याने प्रकाशित केल्या. आपले निरीक्षण कौशल्य, बुद्धिमत्ता आणि अचूक शब्द निवडीची एक वेगळी शैली तयार केली. त्याने त्यावेळेस पंतप्रधान असलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांची अशीच न मुलाखत घेतली होती. ही न - मुलाखत केव्हातरी भाजप नेते प्रमोद महाजनांपर्यंत पोहोचली होती. ही मुलाखत आणि कल्पना प्रमोद महाजन यांना एवढी आवडली की त्यांनी एका प्रवासात प्रत्यक्ष ही मुलाखत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना वाचून दाखवली होती. महाजनांचे मोठेपण असे की त्यांनी एक विशेष पत्र पाठवून धनंजयच्या या वेगळ्या मुलाखतीचे कौतुक केले होते. एका अर्थाने थेट अटलबिहारी वाजपेयी यांच्यासारख्या साहित्यिक अंग असलेल्या व्यक्तीने त्याच्या लेखनाची दखल घ्यावी अशी ही अचाट कल्पना होती.

तसे धनंजयने आपल्या अफाट लेखन शैलीतून साहित्य विश्र्वात एक वेगळे स्थान निर्माण केले होते. मात्र कुठलाही मोठेपणा किंवा गर्व अशी कुठलीही भावना त्याने आपल्याजवळ फिरकू दिली नाही. त्याच्या पुस्तकाला महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती महामंडळाचा पुरस्कार मिळाला तेव्हा पुरस्काराची ही बातमी त्याच्याकडे असून देखील रात्री उशिरापर्यंत त्यांनी ती बातमी तरुण भारतला छापली नव्हती. आपल्याच दैनिकात आपली बातमी कशी छापायची या भूमिकेतून त्याने ही बातमी लपून ठेवली होती. दुसऱ्या दिवशी अन्य दैनिके वाचून तरुण भारत मधीलच एका उपसंपादकाला अशा प्रकारचा पुरस्कार मिळाल्याची बातमी सर्वांना थक्क करून गेली होती.

सुरुवातीची काही वर्ष एकटेपणा, उपेक्षा वाट्याला झालेल्या धनंजयने नंतरच्या काही काळात एकूणच संपादकीय विभागात आपले स्वतःचे असे वेगळे स्थान निर्माण केले होते. त्याचा एकूण साहित्य क्षेत्रातील अनुभव, निगर्वीपणा, सर्वांशी निर्मळ मैत्री करण्याचा स्वभाव अशा अनेक गुणांचाच त्यात अधिक वाटा होता. तरुण भारत मध्ये संगणक व्यवस्था त्यावेळी नुकतीच आली होती. त्याच्याकडे वृत्त संपादक म्हणून जबाबदारी आल्यानंतर तर त्याच्या वेगवेगळ्या कौशल्याला अक्षरशः घुमारे फुटले. दैनिकाच्या मुख्य पानाचा ले आउट हा त्याच्या आवडीचा विषय होता. कितीतरी वेळ बॅनर, फीलर किंवा अन्य विशेष बातमी सजवण्यात तो आपले सारे कौशल्य पणास लावत असे. त्यातही त्याने पहिल्या पानावरती अनेक वेगवेगळे प्रयोग केले होते. पु. ल. देशपांडे गेल्यानंतर संपूर्ण पहिले पान काळे करून केवळ 'पु.ल. गेले' या एकाच शब्दात त्याने पु. ल. देशपांडे यांना वाहिलेली श्रद्धांजली त्याच्या अद्भुत कल्पतेचा एक नमुना होता. प्रत्यक्ष सुनीताताई देशपांडे यांनी देखील त्याच्या या प्रयोगाचे विशेष कौतुक केले होते. तरुण भारतची भूमिका त्याने एवढ्या चटकन आत्मसात केली होती की आमच्यासारखे स्वयंसेवक पत्रकार देखील त्याच्या या भूमिकेमुळे थक्क होत.

दुर्दैवाने काही कारणाने तरुण भारत बंद झाले. असंख्य व्यक्तींनी ज्या मेहनतीने आणि कष्टाने हे दैनिक उभे केले होते ते बंद पडल्याचे दुःख अनेकांसोबतच धनंजयला देखील तीव्रतेने झाले. कारण एकूणच दैनिकाच्या कामात त्याने स्वतःला एवढे गाडून घेतले होते की अन्य कुठलेही विषय दैनिकाच्या कामापुढे त्याच्या दृष्टीने गौण होते. पूर्ण निष्ठा आणि समर्पण भावनेने त्याने तरुण भारत मध्ये आपली सेवा दिली होती. तरुण भारत सोडल्यानंतर कुठल्याही दैनिकात आता काम करायचे नाही असा निर्णय त्याने घेतला होता. खरंतर त्याचा दैनिकातील अनुभव, साहित्य क्षेत्रातील त्याचे नाव, त्याची लेखनशैली एवढे प्रभावी होते की कुठल्याही दैनिकात त्याला सहज नोकरी मिळाली असती. पण त्याने ना कुठल्या दैनिकात अर्ज केला ना कुणापुढे शब्द टाकला. सुदैवाने त्याच काळात सोशल मीडिया सारखे प्रभावी माध्यम उपलब्ध झाल्याने या माध्यमाचा देखील त्याने पुरेपूर उपयोग करत आपल्यातील लेखक जिवंत ठेवला होता. तसे त्याने आपल्या कामाने आणि लेखनाने एक समाजात वेगळे वर्तुळ तयार केले होते पण हळूहळू हे वर्तुळ दिवसेंदिवस छोटे होत गेले. दुर्दैवाने एका विशिष्ट वर्तुळातच राहण्याचा त्याने निर्णय केल्याने माझ्यासारखे त्याचे असंख्य मित्र शेवटपर्यंत त्याला इच्छा असून देखील भेटू शकले नाही. आता तर ही शक्यताच संपली आहे! धनंजय चिंचोलीकरच्या रूपाने साहित्य विश्वातील एक वेगळे स्थान निर्माण करणारे व्यक्तित्व आता यापुढे नसणार आहे. असंख्य किस्से, मनमोकळे क्षण आणि कितीतरी आठवणी ठेऊन हा मित्र दूरच्या प्रवासाला निघून गेला आहे. मित्रा... तरुण भारत मधील तुझ्या असंख्य मित्रांच्यावतीने भावपूर्ण श्रद्धांजली..!

-(महेश काळे)

# एमजीएमच्या मोमना खातून शब्बीर अहमद यांना पीएच. डी. प्रदान

**छत्रपती संभाजीनगर, दि.१६ :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन अँड फॉरेन लँग्वेजेसच्या हिंदी विभागातील संशोधक मोमना खातून शब्बीर अहमद यांना नुकतीच पीएच.डी. प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी हिंदी विभागातील प्रा.डॉ.शहनाज बासमेह यांच्या मार्गदर्शनात 'मेहरुन्निसा परवेज़ के कथा साहित्य का संवेदनात्मक अध्ययन: ( नारी के विशेष संदर्भ में)' या विषयावर आपला शोधप्रबंध सादर केला आहे.

या यशाबद्दल मोमना खातून शब्बीर अहमद यांचे विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ,




कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, परीक्षा नियंत्रक डॉ.हरिरंग शिंदे, सामाजिकशास्त्रे व मानव्यविद्या शाखेच्या अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके, संचालक प्रो. के.पी.सिंग, डॉ.राम गायकवाड, डॉ.मारुती गायकवाड, डॉ.अस्वद गोव्हर, डॉ.साजिद आलम, डॉ.सुरेखा लक्कस, डॉ.प्रज्ञा कोनार्डे, डॉ. रेहाना सय्यद, डॉ.वैशाली माडजे-हजारे, डॉ. सुप्रिया सांगवीकर, डॉ. इम्रान पठाण, डॉ.गजानन देशमुख, संध्या खांडेकर, सपना अजमेरा, सौरभ वांढेकर आदींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

**जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस**

**मा. श्री. एम. ए. शेख, २ रे सह. दिवाणी न्यायाधिश, (क. स्तर ) न्यायालय गंगापूर.**

प्रकरणात पुढील तारीख ०२/०२/२०२६
सिव्हिल एम.ए क्र. ८५०/२०२५
अर्जदार -१) अफिरुजबी बाबु पठाण वय - ७९ वर्ष, धंदा - धरकाम, हनुमान मंदिर जवळ, परदेसपुर, गंगापूर, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद २) आसमाबी गफ्फार खान वय - ५६ वर्ष, धंदा - घरकाम, हनुमान मंदिर जवळा, परदेसपुर, गंगापूर, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ३) शाहरुख गफ्फार खान वय - ३३ वर्ष, धंदा - मजदूरी रा.हनुमान मंदिर जवळ, परदेसपुर, गंगापूर, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ४) फारुख गफ्फार खान वय - ३० वर्ष,
धंदा - मजदुरी रा. बिमाई मस्जिद जवळ, परदेसपुर, गंगापूर, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ५) मोहनखान गफ्फारखान पठाण वय - २८ वर्ष, धंदा - मजदुरी रा. बिमाई मस्जिद जवळ, चमनपुरा, गंगापूर, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ६) मोईन गफ्फार खान वय - २६ वर्ष, धंदा - मजदुरी रा. बिमाई मस्जिद जवळ, परदेसपुरा, गंगापूर, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद
// विरुद्ध //
गैरअर्जदार - निरंक
प्रकरण - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII १८२७ अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.
सर्व जनतेस कळविण्यात येते की उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालयात ॲड. आफताब एम. शेख रा. गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII १८२७ अन्वये लिगाल हेअरशिप सर्टीफिकेट/वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला की, अर्जदार क्र. १ ते ६ हे वरील नमूद ठिकाणी कायमरुपी राहणारे असुन जरदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ याची नणंद आहे. तसेच अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. ३ ते ६ यांची आत्या आहे व अर्जदार क्र. ३ ते ६ हे आपसात सख्खे भाऊ आहे. अर्जदार क्र. १ हिचे वडील व अर्जदार क्र. २ चे सासरे आणिअर्जदार क्र. ३ ते ६ याचे आजोबा नामे अब्दुल जब्बार निसार खान उर्फ जब्बार निसार खान हे दिनांक २८/०४/२०१० रोजी उपचारादरम्यान शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्र. २ यांची सासु आणि अर्जदार क्र. ३ ते ६ यांची आजी नामे खतीजबी जब्बार खान ह्या वयाच वर्षापूर्वी म्हाणजेच सन १९९७-९८ मध्ये मयत झालेल्या त्यांचे मृत्यु प्रमाणपत्र अर्जदाराकडे उपलब्ध नाही. तसेच अर्जदार क्र. १ हिचा भाऊ व अर्जदार क्र. २ हिचे पत्नी आणि अर्जदार क्र. ३ ते ६ यांची वडील नामे गफ्फार जब्बार खान हे दिनांक ०४/०३/२००२ रोजी मौजे गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. त्यामुळे मयत अब्दुल जब्बार निसार खान उर्फ जब्बार निसार खान यांना अर्जदार क्र. १ ही मुलगी व अर्जदार क्र. २ सुन आणि अर्जदार क्र. ३ ते ६नातु या नात्याने कायदेशीर वारसदार असुन अर्जदार क्र. १ ते ६ यांची व्यक्तिरिक इतर कोणही कायदेशीर वारसदार नाही. मयत अब्दुल जब्बार निसार खान यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकीय, निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्रची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरील अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असुन वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणासही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहिर प्रगटन प्रसिद्धी झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानतर आलेला उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्णात येईल करीता जाहिर प्रगटन.
आज दिनांक १६/१२/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायलच्या शिक्यानिशी दिले.

**लिपीक आदेशावरुन**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर**

**जाहीर प्रगटन**

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**
**जा.क. २०२५/मजाका/जमाबंदी/जन्म-मृत्यु नोद/ सिआर ७४ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

दिनांक-०७/११/२०२५
अर्जदार : सोमिनाथ कचरू आहे रा. डोगरगाव ता. कन्नड जि.च. सभाजीनगर
विरूध्द
गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय दोगरगाव ता. कड/ ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर
विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज
उपरोक्त विषयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ/ॲड. दि. एफ. म्हस्के मार्फत स्वतः अर्ज सादर करून अर्जदार वांच्या मुलगाचे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा मुलगा विनोद सोमीनाथ आग्रे चा जन्म दिनांक ०५-०३-२०१० रोजी डोंगरगाव ता. कन्नड येथे आलेला आहे. अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक ०५-०३-२०१० रोजी डोंगरगाव ता. कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यु प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तमा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. नदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार वाचा मुलगा विनोद सोमीनाच आग्रे यांचा जन्म दिनांक ०५-०३-२०१० रोजी डोंगरगाव ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १७-१२-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरुपात आपला आक्षेपः नोदबाबा, मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदाराम दिनांक ०५-०३-२०१० रोजी डोंगरगाव ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरना जाणार नाही. करिता दिनांक/११/२०२५ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

**विभागीय अधिकारी**
**उपविभागीय अधिकारी कन्नड करिता**

**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती आर एस तपाडिया मॅडम. दुसरे सह दिवानी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांचे न्यायालयातून**

०९/०१/२६ किरकोळ अर्ज क्रमांक २२६/२०२५
पु तारीख ०९/१/२०२६
१. सुनिता जयसिंग राजपुत (सुनिता।सागर राजपुत, वय ३१ वर्षे धंदा खाजगी नोकरी रा. रो हाउस नं. २ सिध्दीविनायक रेसीडेन्सी, ता. कन्नड, जि. छ.संभाजीनगर, (औरंगाबाद), २. मालुबाई चतुरसिंग राजपुत वय ६३ वर्षे, धंदा घरकाम, रा. रो हाउस नं २ सिध्दीविनायक रेसीडेन्सी ता. कन्नड, जि छ संभाजीनगर, (औरंगाबाद). बिपीन चतुरसिंग राजपुत, वय ४० वर्षे धंदा खाजगी नोकरी, रा. रो हाउस नं. २ सिद्धीविनायक रेसीडेन्सीता कन्नड जि. छ.संभाजीनगरः (औरंगाबाद), ४ राज सागर राजपुत, वय-१२. वर्षे धंदा शिक्षण, रा. रो हाउस नं २ सिध्दीविनायक रेसीडेन्सी ता. कन्नड, जि छ संभाजीनगर, (औरंगाबाद),
गैरअर्जदार महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी छ. संभाजीनगर जि. छ. संभाजीनगर
अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळणे बाबत **(Bombay Regulation Act).**
तमाम जणतेस सुचित करण्यात येते की ज्या अर्थी अर्जदार यांचे वकिल ॲड. एस. ई. धनेधर पाच्या मार्फत अर्जदाराने या न्यायालयात वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क्र.२ मुलगा अर्जदार क३ चा भाउ व अर्जदार क ४ चे वडील नामे सागर चतुरसिंग राजपुत है दिनांक १८.३.२०१५ रोजी एम. आय. टी. हॉस्पीटल छ संभाजी नगर येथे अल्पशा आजाराने मपत झाले असुन त्यांचा अंत्यविधी मौजे कन्नड येथे करण्यात आला आहे. अर्जा सोबत नगर पालीका कन्नड यांचे कडील मयताचे मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला घेण्यासाठी अर्जदारास वारसप्रमाण पत्राची आवश्यकता आहे. व मयतास अर्जदारा व्यतिरीक्त ईतर कोणीही वारस नाही त्यामुळे अर्जदार मयताच्या वारसप्रमाण पत्राची न्यायालयात मागणी करीत आहे. ज्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत होवुन मिळण्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज मा न्यायालयात दाखल केला आहे सबब या जाहीर प्रगटनाद्वारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कोणाचाही आक्षेप उजर असल्यास सदर जाहीर प्रगटण वर्तमाण पत्रात प्रकाशित झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत पा न्यायालयात व्यक्तीशा किवा रीतसर वकिला मार्फत आवश्यक कागदपत्रासह आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयताचे कायदेशिर वारस असल्या बाबतचे वारस प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल सबब आज दिनांक २/२०२५ रोजी माझे सही निशी व मा. न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले
दिनांक.१.१२.२०२५

**लिपीक**
**दिवाणी न्यायालय क स्तर कन्नड**
**आदेशावरुन सहायक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय क. स्तर कन्नड**

## अग्रलेख...

# दक्षिण दिग्विजयाचे नवे दार!

केरळच्या सत्ताकारणावर साम्यवाद्यांचा वरचष्मा असेलही; पण तेथील जनतेच्या धार्मिक भावना संवेदनशील असल्याने, सत्ताकारणाच्या डावपेचांत त्या भावनांना धक्का पोहोचतो तेव्हा ही जनता राजकारणाच्या पठडीपल्याड जाऊन धर्मभावनेला संवेदनशीलतेने जपते आणि प्रसंगी ठोस भूमिका घेते असा अलिकडेच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक निकालांचा अर्थ आहे. केरळची राजधानी असलेल्या तिरुवनंतपुरमच्या महापालिका निवडणुकीत कम्युनिस्टप्रणीत डाव्या लोकशाहीवादी आघाडीची तब्बल साडेचार दशकांच्या सत्तेची मक्तेदारी संपुष्टात आणून मतदारांनी भारतीय जनता पार्टीला दिलेला कौल ही या राज्याच्या राजकारणाला मिळालेली ऐतिहासिक कलाटणी होय. येत्या वर्षात केरळमध्ये होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांचा रागरंग कसा असेल, याची स्पष्ट जाणीवही या निकालांनी करून दिल्याने, कम्युनिस्टांच्या उरल्यासुरल्या सत्तास्थानांस सुरुंग लागण्यास सुरुवात झाल्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत. निवडणूक आयोगाने वारंवार आव्हाने दिल्यानंतर आणि स्पष्टीकरणे केल्यानंतरही मतचोरीचा बिनबुडाचा आरोप सतत करून जनतेच्या मनात गैरसमज पसरविण्याचे व मतदान प्रक्रियेच्या विश्वासार्हतेविषयी संभ्रम माजविण्याचे देशव्यापी प्रयोग केरळातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही मतदारांनी हाणून पाडले. परिणामी कम्युनिस्टांपाठोपाठ काँग्रेसप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीलाही आपली नेमकी जागा कळून चुकली आहे. तिरुवनंतपुरम हा काँग्रेसचे नेते शशी थरूर यांचा बालेकिल्ला मानला जातो. २००९ पासून या लोकसभा मतदारसंघात ते सातत्याने विजयी होत आले आहेत. या महापालिकेच्या १०१ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत मात्र, भाजपाने घेतलेली आघाडी कम्युनिस्टांप्रमाणेच थरूर यांनी केलेल्या बांधणीला सैल करणारीही ठरली आहे. तब्बल ५० जागांवर भाजपला मिळालेला विजय म्हणजे भाजपच्या गेल्या दोन दशकांतील दक्षिण दिग्विजय संकल्पांतर्गत सातत्याने राबविलेल्या मोहिमेचे सर्वाधिक तेजस्वी यश म्हणावे लागेल.

केरळसारख्या राज्यात, जेथे जेमतेम शिरकाव करणेदेखील फारसे साध्य झाले नव्हते, तेथेही राजधानीचे शहर असलेल्या महापालिकेवर सत्तेचा झेंडा रोवण्याएवढी मजल मारणाऱ्या भाजपाच्या दक्षिण दिग्विजयाच्या संकल्पपूर्तीची पताका आता या राज्यातही फडकू लागली आहे. केरळच्या निवडणुकांच्या राजकीय इतिहासात प्रथमच, १०१ पैकी ५० जागांवर बाजी मारून महापालिकेची सत्ता ताब्यात घेण्याचा भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा हा विक्रम प्रस्थापित कम्युनिस्टांच्या सत्तेस अनपेक्षित धक्का देणारा आहेच. शिवाय, तो भविष्यात कम्युनिस्टांचा सत्तेवरील झेंडा उतरविण्याची वेळ आल्याचा इशारादेखील आहे. धर्मभावनेशी संबंधित संवेदनशील बाबींमधील राजकीय हस्तक्षेपाच्या विरोधात नोंदविलेल्या निषेधाचा स्पष्ट संदेशही या निवडणुकीच्या निमित्ताने जनतेने कम्युनिस्ट सत्ताधीशांना दिला. धार्मिक भावनांशी खेळ करून संवेदनांची खिल्ली उडविणे सहन होणार नाही याची जाणीवही या निमित्ताने जनतेने करून दिली आहे. महापालिकेच्या मावळत्या सत्तेवर माकपप्रणीत डाव्या लोकशाही आघाडीचे १०१ पैकी ५१ सदस्य होते, तर काँग्रेसप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीचे १९ सदस्य होते. भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीची सदस्यसंख्या ३५ ची मजल गाठू शकली होती. आता नव्या निकालांनी संख्याबळाचे गणित पुरते उलटे झाले आहे. भाजपने ५० जागांवर, तर माकपप्रणीत डाव्या आघाडीने २९ जागांवर विजय मिळविला आहे. काँग्रेसप्रणीत आघाडीला नऊ जागांचा फायदा झाला असला, तरी भविष्यातील कोणत्याही निवडणुकीत माकपप्रणीत आघाडी व काँग्रेसप्रणीत आघाडी यांच्यात कोणत्याही प्रकारची युती वा आघाडी होण्याची शक्यता माकपने पुरती फेटाळून लावलेली असल्याने काँग्रेसच्या नीतीचा कोणताही उपयोग या राज्यात होणार नाही. तसेही, राहुल गांधी यांच्या हट्टामुळे व्होटचोरीसारख्या निराधार मुद्याचे बांडगूळ काँग्रेसच्या निवडणूक नीतीला चिकटून राहिल्याने त्या पक्षाची फरफटच सुरू आहे. ही नीती निष्फळ असल्याचे केरळच्या नव्या निकालांनी स्पष्ट झाले आहे. काँग्रेससोबत आघाडी करून तिरुवनंतपुरमची सत्ता राखण्याच्या चर्चेस तर माकपचे केरळ प्रदेश सरचिटणीस एम. व्ही माधवन् यांनी केव्हाच पूर्णविराम दिला आहे. भाजपला आपला पाया मजबूत करण्यासाठी ही भूमिका पथ्यावरच पडणार आहे. येत्या काही दिवसांतील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नियोजित केरळ दौऱ्यानंतर भाजपच्या स्थानिक राजकारणास आणखी बळ मिळेल आणि केरळच्या स्थानिक सत्ताकारणाची गणिते नव्याने आखण्यासाठी आगामी विधानसभा निवडणुकांपर्यंतच्या काळात भाजपला बळ मिळेल यात शंका नाही. केरळच्या लोकसंख्येच्या दृष्टीने बहुसंख्य मानला जाणारा इझावा समाज हा डाव्या आघाडीचा आणि विशेषत: मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीचा हुकमी मतदार मानला जातो. आता हा समुदाय भाजपाकडे वळल्याचे या निकालांतून दिसू लागले आहे. समाजसुधारणा चळवळीत महत्त्वाचा सहभाग असलेल्या या समुदायाचे राजकीय वजन ज्या पक्षाकडे झुकेल, त्यास केरळच्या राजकारणात आपले स्थान भक्कम करता येईल, असे म्हटले जाते. येत्या वर्षभराच्या आतच केरळ विधानसभेच्या निवडणुकीत भक्कम बहुमत मिळविण्याचे डाव्या आघाडीचे मनसुबे या निकालांनी निकालात निघतील अशी चर्चा आहे.

या निकालांचे विश्लेषण करताना, सामाजिक भावनांचा एक नाजूक कंगोरा नजरेआड करून चालणार नाही. केरळच्या जनतेचे श्रद्धास्थान असलेल्या शबरीमाला मंदिरातील सोन्याच्या मुलाम्यात झालेल्या कथित गैरव्यवहार किंवा चोरीच्या आरोपांमुळे केरळचे राजकारण ढवळून निघाले आहे. काँग्रेसप्रणीत लोकशाही आघाडी आणि भाजप यांनी या प्रकरणात सत्ताधारी डाव्या आघाडीवर आणि त्रावणकोर देवस्थान समितीवर सातत्याने आरोपांच्या फैरी झाडून मुख्यमंत्री पिनाराई विजयन् यांचे सरकार हे प्रकरण दडपू पाहात असल्याचा आरोप केला आहे. शबरीमाला मंदिर हा भाविकांचा संवेदनशील मुद्दा असल्याने, या मंदिरातील कथित सोनेचौर्य प्रकरणास मिळालेले राजकीय वळण हा मुद्दाही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विजयन् सरकारच्या विरोधातील जनमानसाच्या भावनांना साद घालणारा ठरला. भाविकांच्या संवेदनशीलतेचा मुद्दा या निवडणुकीत उचलला गेल्याने सत्ताधारी डाव्या आघाडीच्या विरोधातील रोष आणि धार्मिक भावनांचा आदर करून मतदारांस आपलेसे करण्याचे भाजपप्रणीत आघाडीचे धोरण यामुळे भाजप आघाडीचा विजय अधिक सोपा झाला. शबरीमाला हे केवळ धार्मिक स्थळ नसून केरळच्या राजकारणातील आस्था आणि संस्कृतीचा केंद्रबिंदू मानला जातो. सोन्याच्या कथित चोरीचा मुद्दा थेट भाविकांच्या भावनांशी जोडला गेला आणि मंदिरांच्या सुरक्षेत डाव्या आघाडीचे सरकार सपशेल अपयशी ठरल्याचा तसेच हिंदू देवतांच्या मालमत्तांचे संरक्षण करण्यात सरकारकडून ढिलाई होत असल्याचा थेट आरोपही केला गेला. साहजिकच, हिंदुबहुल विभागांतील मतदार डाव्या आघाडीपासून व काँग्रेसप्रणीत आघाडीपासून दुरावला आहे. आता या मतदारांच्या धार्मिक भावनांचा आणि देवतांविषयीच्या संवेदनांचा आदर करून आपली कटिबद्धता दाखविण्याची भाजपची जबाबदारी या निकालांमुळे साहजिकच वाढली आहे. राजकारणाच्या जागी राजकारण करावे, ही केरळच्या जनतेची मानसिकता आहेच. त्यामुळेच धार्मिक वृत्ती जपतानाही या राज्याने कम्युनिस्टांच्या हाती सत्ता सोपविली होती. जेव्हा धर्माच्या संदर्भातील संवेदनशील बाबींना धक्का पोहोचल्याचे दिसू लागले, तेव्हा मात्र, समाजाने धार्मिक संवेदनांना महत्त्व दिले हे स्पष्ट झाले आहे. केरळच्या राजधानीत डाव्यांना मिळालेला धक्का हा केवळ स्थानिक निवडणुकीच्या निकालापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी त्यांच्यासाठी एक मोठी धार्मिक व राजकीय धोक्याची घंटा ठरला आहे. भाजपच्या दक्षिण दिग्विजयात मंदिर सुरक्षेच्या मुद्याचा मोठा वाटा आहे, हे स्पष्ट झाले आहे.

## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# चीनच्या नौदलाची धास्ती

गेल्या महिन्यात चीनने त्यांचे 'फुजियान' हे आतापर्यंतचे सर्वांत प्रगत विमानवाहू जहाज लाँच केले. ते मागील दोन जहाजांपेक्षा खूपच प्रगत आहे. 'फुजियान' ही देशातील तिसरी अशी युद्धनौका आहे, जी इलेक्ट्रोमॅग्नेटिक कॅटापल्ट्सने सुसज्ज आहे. ती विमानांना जास्त वेगाने उड्डाण करण्यास सक्षम करते. तज्ज्ञांच्या मते, यामुळे चीन पश्चिम पॅसिफिक भागामध्ये अमेरिकेच्या वर्चस्वाला आव्हान देण्याच्या ध्येयाच्या जवळ येतो. हे जहाज ऐंशी हजार टन वजनाचे आहे. तैवानच्या सर्वांत जवळ असलेल्या चिनी प्रांताच्या नावावरून त्याला 'फुजियान' असे नाव देण्यात आले. ते ७० विमाने वाहून नेऊ शकते. यामध्ये लढाऊ विमाने, हेलिकॉप्टर आणि पूर्वसूचना देणारी विमाने समाविष्ट आहेत. ती लांब पल्ल्याच्या धोक्यांचा शोध घेऊ शकतात. ते हवाई संरक्षण प्रणालींचे चांगले समन्वय साधण्यास आणि अचूक हल्ले करण्यास सक्षम आहे. 'फुजियान' हे 'फ्लॅट फ्लाईट डेक' आणि 'इलेक्ट्रोमॅग्नेटिक कॅटपल्ट' तंत्रज्ञानासह चीनचे पहिले विमानवाहू जहाज आहे. त्यामुळे ते जादा वजनाची विमाने लाँच करू शकते. अधिक इंधन आणि शस्त्रे वाहून नेऊ शकते. जगात फक्त अमेरिकेकडेच ही क्षमता आहे. यामुळे चीनच्या वाहक 'स्ट्राईक ग्रुप'ला एका नवीन पातळीवर नेण्यात आले आहे. ते लिओनिंग आणि शेडोंगला मागे टाकत आहे. चीनमध्ये बनवलेली ही युद्धनौका जड शस्त्रे आणि इंधनाने सुसज्ज विमाने लाँच करू शकते आणि लांब अंतरावरून शत्रूच्या लक्ष्यांना लक्ष्य करू शकते. हे चीनच्या दोन विद्यमान युद्धनौकांपेक्षा अधिक शक्तिशाली आहे. यापूर्वीच्या युद्धनौका लिओनिंग आणि शेडोंग या दोन्ही रशियन मदतीच्या बांधण्यात आल्या होत्या.

दखल घेण्याजोगी बाब म्हणजे या नौका 'फ्लॅट डेक' आणि 'इलेक्ट्रोमॅग्नेटिक कॅटपल्ट' विमानाच्या टेकऑफ आणि लॅण्डिंग क्षमतांमध्ये लक्षणीय वाढ करतात. स्की-जंप प्लॅटफॉर्म असलेल्या डेकवर उड्डाण करताना, वैमानिकांना वजन कमी करण्यासाठी आपली शस्त्रे खाली करावी लागतात. त्यामुळे ऑपरेशनल लवचीकता मर्यादित होते. चिनी माध्यमांनी 'फुजियान'चे वर्णन चिनी नौदलाच्या विकासातला एक प्रमुख टप्पा असे केले आहे. चीनच्या तिन्ही विमानवाहू जहाजांवर डिझेल इंजिन चालतात. त्यामुळे त्यांना वेळोवेळी इंधन भरण्याची आवश्यकता असते; परंतु चीन आता अमेरिकेप्रमाणे 'गनबोट डिप्लोमसी' करू शकेल आणि 'न्यू यॉर्क टाईम्स'ने म्हटल्याप्रमाणे, हे चीनच्या 'बचावात्मक आधुनिकीकरण'वरून 'आक्रमक शक्ती प्रक्षेपण'कडे जाण्याचे संकेत देते. चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी एक विधान केले. त्यात म्हटले होते की, पॅसिफिक महासागर इतका मोठा आहे की अमेरिका आणि चीन दोघांसाठीही जागा आहे. हे विधान अमेरिकेशी स्पर्धा करण्याची



चीनची महत्त्वाकांक्षा प्रतिबिंबित करते. शी जिनपिंग यांच्या नेतृत्वाखाली चीनने आपल्या नौदलाचा वेगाने विस्तार केला आहे आणि आता त्यांच्याकडे जगात सर्वांत जास्त जहाजे आहेत. त्यामुळे अमेरिका आणि मित्रराष्ट्रांवर दबाव वाढत आहे. सरकारी माध्यमांनुसार, शी जिनपिंग यांनी स्वतः 'फुजियान'मध्ये 'इलेक्ट्रोमॅग्नेटिक कॅटपल्ट' बसवण्याचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियन 'स्ट्रॅटेजिक पॉलिसी इन्स्टिट्यूट'ने 'फुजियान'चे वर्णन जलद-प्रतिक्रिया प्रतिबंधक शक्ती म्हणून केले आहे. ते लढाऊ विमाने तैनात करण्यास आणि जमीन आणि समुद्रातून हल्ले करण्यास सक्षम आहे.

चीन तैवानला आपल्या भूभागाचा भाग मानतो आणि त्याने हा देश कधीही जोडण्याचा आपला हेतू व्यक्त केला आहे. त्यासाठी बळाचा वापर करावा लागला तरी त्याची तयारी आहे. 'फुजियान' तैवानच्या पूर्वेकडील संरक्षण रेषांना धोका निर्माण करू शकते. तथापि, ओकिनावा, दक्षिण कोरिया, गुआम आणि फिलीपिन्स हे अमेरिकन लष्करी तळ चीनला कोणत्याही हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यास सक्षम आहेत. अमेरिकेची सर्व ११ विमानवाहू जहाजे अणुऊर्जेवर चालतात. याउलट, चीनची तीन विमानवाहू जहाजे डिझेल इंजिनवर चालतात. त्यांना वारंवार इंधन भरावे लागते. त्यामुळे त्यांची लढाऊ क्षमता मर्यादित होते. जपानच्या 'नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर डिफेन्स स्टडीज'च्या इटा मोरिकी यांनी ऑक्टोबर २०२५ मध्ये केलेल्या मूल्यांकनात म्हटले आहे की चीनला अजूनही अनेक तांत्रिक आणि मानवी संसाधन आव्हानांना तोंड द्यावे लागते. फुजियान आणि चीनच्या इतर विमानवाहू जहाजांची एकूण लढाऊ क्षमता आणि अनुभव अजूनही अमेरिकेपेक्षा खूप मागे आहे. अमेरिकेचे रिअर ॲडमिरल ब्रेट मियाटस यांनी 'वॉशिंग्टन पोस्ट'ला सांगितले की चीनकडे तीन विमानवाहू जहाजे आहेत तर अमेरिकेकडे ११ आहेत आणि आम्ही हे अनेक दशकांपासून करत आहोत. क्षेपणास्त्र तंत्रज्ञानाने विमानवाहू जहाजांचे धोरणात्मक महत्त्व काहीसे कमी केले असले आणि ड्रोन (मानवरहित विमान) साठी एआय तंत्रज्ञान पूर्णपणे विकसित झाले, तर विमानवाहू जहाजे आणखी प्रभावी होऊ शकतात.

चीन चौथे विमानवाहू जहाज बांधत असून भविष्यात अणुऊर्जेवर चालणारा वाहक सादर करण्याची योजना आखत आहे. येत्या काळात अमेरिका आणि चीनमधील नौदल शस्त्रास्त्रांची स्पर्धा आणखी तीव्र होईल अशी भीती तज्ज्ञांना आहे. चीनशी वाढत्या धोरणात्मक स्पर्धेच्या वेळी 'खूप जलद आणि लवकरच' अधिक जहाजे बांधण्याचे आवाहन ट्रम्प यांनी नुकतेच केले. 'आमचा जहाजबांधणी उद्योग सध्या अगदी कमी प्रमाणात आकुंचन पावला आहे,' असे 'मरीन कॉर्प्स'चे कमांडंट जनरल एरिक स्मिथ यांनी गेल्या वर्षीच्या अखेरीस पेंटागॉन येथे दिलेल्या विशेष मुलाखतीत सांगितले होते. ट्रम्प यांच्या घोषणेपूर्वी अनेक महिन्यांपर्यंत अमेरिकन लष्करी आणि उद्योग अधिकाऱ्यांच्या डझनभराहून अधिक मुलाखतींद्वारे अमेरिकन जहाजबांधणी आणि जहाज देखभालीची अशक्त स्थिती आणि त्यांच्यामुळे लष्कराला होणारे धोके पुढे आले होते. अमेरिकेचे नौदल अजूनही अण्वस्त्रशक्ती आणि टनेजच्या बाबतीत जगातील सर्वांत शक्तिशाली मानले जाते; परंतु नौदलाच्या जहाजांची संख्या चीनपेक्षा कमी झाली आहे. अमेरिकेच्या ताफ्यात २९६ जहाजे आहेत, तर चीनच्या जहाजांची संख्या या वर्षी चारशेच्या पुढे जाण्याची शक्यता आहे.

२०२५ च्या अर्थसंकल्पात सहा नवीन जहाजांना निधी देण्यात आला होता, तर १९ जहाजे काढून टाकण्यात आली होती. उद्योजकांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्याकडे अधिक जहाजे बांधण्यासाठी आणि दुरुस्त करण्यासाठी जागा आहे; परंतु नौदलाचे करार दुर्मिळ आहेत. 'आम्ही जवळजवळ अर्ध्या क्षमतेने काम करत आहोत,' असे 'बीएई सिस्टिम्स शिप रिपेअर'चे उपाध्यक्ष ब्रॅड मोयर म्हणाले. ही कंपनी अमेरिकेतील जहाज दुरुस्तीसाठी सर्वांत मोठ्या कंपन्यांपैकी एक आहे. 'हजारो पुरवठादार व्यवसायाबाहेर गेले आहेत आणि हा एक खरा धोका आहे,' असे 'फेअरबँक्स मोर्स डिफेन्स'चे सीईओ जॉर्ज व्हिटियर यांनी सांगितले. ही कंपनी उत्तर आणि दक्षिण अमेरिकेतील सर्वांत मोठी इंजिन उत्पादक आहे आणि लष्कराच्या उभयचर युद्धनौकांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सर्वांत मोठ्या इंजिनांचा पुरवठा करणारी एकमेव अमेरिकन कंपनी आहे. 'आपल्याकडे दोन इंजिन पुरवठादार असले पाहिजेत; पण वास्तव असे आहे, की नौदल वर्षाला फक्त सहा जहाजे बांधणार असेल, तर दोन तर सोडाच, एक इंजिन पुरवठादार व्यवसायात ठेवणे ही एक संघर्षाची बाब आहे. आपल्याला यातून बाहेर पडण्याचा मार्ग काढावा लागेल,' असे एका अमेरिकन अधिकाऱ्याचे मत अमेरिकेची हताशा दाखवते.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# वाळू तस्करांना पोलिसी हिसका

वाळू तस्करांकडून महसूल आणि पोलिस अधिकाऱ्यांवर हल्ले होणे, त्यांना धमकावणे आणि सरकारी कामात अडथळा आणणे असे प्रकार महाराष्ट्रात वारंवार घडतात, कारण या व्यवसायात मोठा पैसा गुंतलेला असतो. या हल्ल्यांमध्ये प्रशासनाच्या पथकांवर, अधिकाऱ्यांवर गाड्या चढवणे, शस्त्रांचा वापर करणे, धमकावणे यांसारख्या घटनांचा समावेश असतो. जळगाव, अहमदनगर (श्रीरामपूर), सातारा यासारख्या जिल्ह्यांमध्ये अशा घटना घडल्या आहेत. अवैध उत्खनन व वाहतूक, नदीपात्रातून बेकायदेशीरपणे वाळू उपसा करणे आणि तिची चोरटी वाहतूक करणे ही हल्ल्यांची मुख्य कारणे आहेत.

काही ठिकाणी अधिकाऱ्यांकडून हप्तेखोरी होत असल्यामुळे वाळू व्यावसायिकांचा अधिकाऱ्यांवरचा राग वाढून हल्ले होतात असेही समोर आले आहे. नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर येथे महसूल विभागाला काळिमा फासणारी घटना घडली आहे. अवैध रेती वाहतूक रोखण्यासाठी गेलेल्या प्रभारी तहसीलदारावरच त्यांच्या हाताखालील तलाठ्याने हल्ला चढवला. महसूल विभागाचा कणा समजला जाणारा तलाठीच जर वाळू तस्करांच्या वतीने तहसीलदारावर हात उगारत असेल तर सामान्यांनी कोणाकडे तक्रार करायची असा प्रश्न निर्माण झाला आहे. या गंभीर प्रकारानंतर तहसीलदार राजेश शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीवरून मुजोर तलाठी प्रदीप पाटील याच्यावर अर्धापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राज्यातील वाळू चोरी रोखण्यासाठी पुढील आठवड्यात नवीन वाळू धोरण आणण्यात येणार आहे. नवीन वाळू धोरणात आता महसूल विभागाप्रमाणे पोलिसांना कारवाईचे अधिकार असणार आहेत. तसेच घरकूल बांधणाऱ्यांनी अर्ज केल्यानंतर १५ दिवसांत पाच ब्रास वाळू मिळाली नाही तर संबंधित तहसीलदारांवर कारवाईचा बडगा उगारण्यात येईल, असा इशारा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिला. विधानसभा सदस्य नरेंद्र मेहता यांनी सभागृहात लक्षवेधी सूचना मांडली. भंडारा जिल्ह्यातील तुमसर, भंडारा, साकोली येथे वैनगंगा खोऱ्यातील वाळूला मोठ्या प्रमाणात मागणी आहे. त्यामुळे या ठिकाणी अनधिकृत वाळू व्यवसायाचा बोलबाला आहे. राज्यातील अनेक भागांत बेकायदा वाळू व्यवसाय फोफावला आहे. त्यामुळे अशा वाळू माफिया व वाळू तस्करीत सहभागी लोकांवर कारवाई करण्यात येणार का असा सवाल आ. नरेंद्र मेहता यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे उपस्थित केला. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी उपविभागीय अधिकारी गजेंद्र बालपांडे यांच्या निलंबनाची घोषणा विधानसभेत केली. भंडारा जिल्ह्यातील वाळू डेपोच्या अवैध उत्खननाला जबाबदार धरून उपविभागीय अधिकारी गजेंद्र बालपांडे यांना निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच तत्कालीन तहसीलदार यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील सर्वांत मोठा प्रकल्प खडकपूर्णा धरण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अवैधपणे वाळूचा उपसा होत असल्याच्या अनेक तक्रारी दिवसेंदिवस वाढत होत्या. परिसरातील नागरिकांनी अवैध रेती उपसा संदर्भात ३०० च्या वर तक्रारी करूनही महसूल प्रशासनाने दखल घेतली नाही. मात्र तक्रार प्राप्त होताच पोलिस अधीक्षक नीलेश तांबे यांनी दखल घेत खडकपूर्णा धरण क्षेत्रातील वाळू माफियांवर स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने कारवाई केली आहे. अलिकडच्या काळात ही सर्वांत मोठी कारवाई असून जवळपास सात वाळू उपसा करणाऱ्या बोटीसह ९० लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई महसूल प्रशासनाने करणे अपेक्षित असताना पोलिसांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने ही कारवाई केल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. बुलढाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी स्वत: अवैध रेती वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करून घरकूल बांधकामासाठी रेती उपलब्ध करून देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. त्यामुळे रेती माफियांच्या व्यवसायावर परिणाम झाला आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक व जिल्हाधिकारी यांच्या धडक कारवाईचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

९८८१७१७८२८

## इतस्तत:

**दत्तात्रेय आंबुलकर**

# कौशल्य विकासाला नवी चालना!

विकसित भारताचे उद्दिष्ट अपेक्षित पद्धतीने साध्य करण्यासाठी केंद्र सरकारने देशांतर्गत कामगार-कारागिरांच्या कौशल्य विकासासाठी ११ प्रमुख मुद्यांवर विशेष भर देण्याचा निर्णय घेतला असून, त्या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात करण्यात आली आहे. या संदर्भात केंद्र सरकारने राज्यांच्या मुख्य सचिवांना पाठविलेल्या पत्रात राज्यस्तरावर आवश्यक अशा कौशल्य विकास विषयक उपक्रम राबविण्यासाठी राज्यनिहाय कौशल्य गरजांचा अभ्यास करून त्यानुसार, प्राधान्य तत्त्वावर उपाययोजना करण्यासाठी सूचनावजा निर्देश देण्यात आले आहेत, हे विशेष.

या संदर्भात केंद्र सरकारतर्फे प्रामुख्याने नमूद केलेली बाब म्हणजे, कौशल्यपूर्ण काम करणारे कर्मचारी व कारागिरांमध्ये महिलांची अद्याप अपुरी असणारी संख्या व टक्केवारी. यासंदर्भात उत्पादनक्षेत्र व सेवा उद्योगात महिलांच्या कौशल्य प्रशिक्षणाच्या संदर्भात समान अनास्था असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले आहे. सरकारी तपशील व आकडेवारीनुसार, सद्य:स्थितीत केंद्र व राज्य सरकारांच्या संयुक्त प्रयत्न आणि पुढाकारातून विविध टप्प्यांवरील व विविध स्वरूपातील २० उपक्रमांच्या माध्यमातून सर्व स्तरांवर कौशल्य विकासासाठी प्रयत्न होत असूनही या प्रयत्नांना अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. या संदर्भात कौशल्य विकासाला अधिक प्रभावी व गतिमान करण्यासाठी पाचव्या राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेच्या पृष्ठभूमीवर केंद्र सरकारने नव्याने व नव्या संदर्भासह पुढाकार घेतला आहे. औद्योगिक व ग्रामीण विकास या उभय क्षेत्रांमध्ये व्यापक प्रमाणात समयबद्ध स्वरूपात कौशल्य विकास साधण्यासाठी केंद्र सरकारच्या विशेषत: कौशल्य विकास, उद्योजकता विकास व ग्रामीण विकास मंत्रालयांनी आता खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली असून, त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध राज्य सरकारांना निर्देश दिले आहेत.

**अपर्याप्त कौशल्य विकास** : देशांतर्गत कौशल्य विकासाच्या पडताळणीत असे आढळून आले आहे की, देशपातळीवर १५ ते २९ वर्षे या विद्यार्थी वयोगटात कौशल्यप्राप्त उमेदवारांचे प्रमाण सध्या देशाच्या लोकसंख्येच्या तुलनेत केवळ ४.४२ टक्के आहे. तुलनात्मकदृष्ट्या दक्षिण कोरियातील औपचारिक कौशल्यप्राप्त उमेदवारांची टक्केवारी ९६ टक्के, जपानची ८० टक्के, तर जर्मनीतील कौशल्यप्राप्त उमेदवारांचे प्रमाण ७५ टक्के आहे. यावर तातडीने व प्राधान्य तत्त्वावरील उपाययोजना म्हणून राज्य सरकारांना कौशल्यविषयक



पडताळणी घेऊन संबंधित राज्यांमधील गरजांनुरूप मुख्य शिक्षण व शैक्षणिक अभ्यासक्रमाची सांगड कौशल्यविषयक शिक्षणाशी घालण्याचे आग्रही निर्देश देण्यात आले आहेत.

**नव-उद्योगांसाठी नवे कौशल्य** : नव्याने विकसित होणाऱ्या वा प्रचलित व विकसित होणाऱ्या उद्योगांना पूरक ठरून अशा उद्योगांच्या विकासासाठी व त्याचवेळी अशा उद्योगांना पूरक अशा कौशल्यप्राप्त उमेदवारांची सांगड घालण्यावर भर दिला जाणार आहे. या संदर्भात प्रामुख्याने व वानगीदाखल विस्तारित होणाऱ्या हवाई वाहतूक व त्यासाठी आवश्यक.

**उमेदवारांची रोजगारक्षमता वाढविणे** : नव्याने विविध अभ्यासक्रमांसह उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची उमेदवार म्हणून रोजगारक्षमता वाढविण्यावर भर देणे अत्यंत आवश्यक आहे. सद्य:स्थितीत आपल्याकडे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी साधारणपणे ४१ टक्के, तर शासकीय तंत्रनिकेतनमधून पदविकाधारक उमेदवारांपैकी सुमारे २९ टक्के उमेदवारच रोजगारयोग्य असतात.

**कौशल्य विकासामध्ये उद्योगांची भागीदारी** : केंद्र व राज्य स्तरावरील विभिन्न मंत्रालये, शासकीय विभाग, विद्यापीठांतर्गत तंत्रज्ञान-व्यवस्थापन संस्था इत्यादींमध्ये शिक्षणासह कौशल्य विकासासाठी विशेष प्रयत्न करण्याचे उपक्रम व अभ्यासक्रम सुरू होऊनही या प्रयत्नांचा प्रत्यक्ष कौशल्यविकासावर फारसा परिणाम झालेला नाही. यावर अधिक प्रभावी व परिणामकारक उपाययोजना म्हणून या कामी उद्योगांनी पुढाकार घेणे गरजेचे ठरले आहे. त्याशिवाय, विद्यापीठ व शैक्षणिक संस्थांनी उद्योगांची वाढती व बदलती गरज लक्षात घेता, तंत्रज्ञान व शैक्षणिक अभ्यासक्रमातच कौशल्यांचा समावेश करणे आता काळाची गरज ठरली आहे. अशी उपाययोजना करणे राज्य सरकारांनी प्राधान्यक्रमावर हाती घ्यावे, हे मात्र आवश्यक आहे.

**शिक्षण-कौशल्याचा समन्वय** : केंद्र सरकारच्या कौशल्य विकास व शिक्षण विभागातर्फे केंद्र व राज्य या उभय स्तरांवर शिक्षण आणि कौशल्याचा समन्वय साधण्यावर वेळोवेळी भर दिला आहे, याला अधिक गतिमान करण्याची गरज आहे. यासाठी विविध स्तरांवर व गरजांनुरूप शिक्षण - शैक्षणिक वा तंत्रज्ञानविषयक अभ्यासक्रमावर आधारित कौशल्य विकास-विषयक उपक्रम घेऊन त्यांची कालबद्ध स्वरूपात अंमलबजावणी व्हायला हवी.

**कौशल्य विकास प्रयत्नातील सातत्य** : कौशल्य विकास-विषयक प्रयत्नांना केवळ तात्कालिक स्वरूपात व उपक्रम स्वरूपाचे न ठेवता, या प्रयत्नांमध्ये सातत्य आणणे आणि टिकविणे गरजेचे ठरते. यातून उमेदवारांपासून उद्योगांपर्यंतच्या प्रमुख घटकांच्या गरजा पूर्ण होण्यास मदत होईल. अशा प्रकारच्या प्रत्यक्ष कौशल्यवाढीतून रोजगारवाढीला पण चालना मिळेल, हे महत्त्वाचे.

**कौशल्यविषयक प्रशिक्षकांचा अभाव व अपुऱ्या प्रशिक्षण सुविधा** : राज्य व देशपातळीवर आज व आगामी काळातील कौशल्य प्रशिक्षणाच्या गरजा लक्षात घेता, आजच कौशल्यक्षेत्रातील प्रशिक्षणाची वाढती चणचण आहे. विशेषतः विविध संदर्भात कौशल्य विकास हे क्षेत्र परंपरागत व चाकोरीबाहेरील असे क्षेत्र असल्याने त्यासाठी केवळ संबंधित विषयातील पात्रताधारकच नव्हे, तर कौशल्यांचा थेट व प्रत्यक्ष सराव-संबंध असणारे प्रशिक्षक आवश्यक असतात. ही गरज तातडीने पूर्ण करण्याचे काम विशेषतः राज्यस्तरावर पूर्ण व्हायला हवे.

**कौशल्य विकासातील समतोल** : कौशल्य विकासाच्या संदर्भात विचार करताना साधारणपणे तंत्रज्ञानासह व्यवसाय-व्यवस्थापन इ. वरच अधिक भर दिला जातो. मात्र, नव्या मार्गदर्शक सूचनांनुसार, केंद्र सरकारने राज्य सरकारांना कौशल्य विकासासाठी व ग्रामीण व कृषीशी संबंधित कौशल्यांचा समावेश करण्याची महत्त्वपूर्ण सूचना केली आहे, हे विशेष.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## आजचे संघगीत-७४

मंगळवार, १६ डिसेंबर २०२५

### सिंधु स्रोत से हिन्दु सिन्धु तक, रहते आये...

सिंधु स्रोत से हिन्दु सिन्धु तक, रहते आये रहते हैं
इस धरती को मां कहते जो, हिन्दू उनको कहते हैं ।

हिन्दू उनको कहते हैं हम हिन्दू उन्हें ही कहते हैं
सम्प्रदाय हो चाहे जो भी, पूजा का कुछ ढंग रहे
प्रांत जाति का प्रश्न नहीं, कुछ काला गोरा रंग रहे
सब समाज से अपनापन हो, सुख-दुःख में नित संग रहे
राष्ट्र देह परिपुष्ट बनाने, जुटे सदा जो अंग रहे
मिलकर बढ़ते चरम शिखर तक, मिलकर संकट सहते हैं
हिन्दू उनको कहते हैं हम हिन्दू उन्हें ही कहते हैं ॥

एक हमारा रक्त, रक्त में, एक भारती धारा है
एक हमारा शील, शील में, एक भरी मर्यादा है
आजादी है बसी प्राण में, प्राण योग से बांधा है
भौतिकता के मस्त गज़ों को, संयम द्वारा साधा है
मानवता के अडिग उपासक, दानवता को दहते हैं
हिन्दू उनको कहते हैं हम हिन्दू उन्हें ही कहते हैं ॥

आज संघ फिर जुटा यत्न में, हिन्दू भाग्य जगाने को
सदियों से संचित कष्टों को, जड़ से खोद मिटाने को
खुला निमन्त्रण सभी सुतों को, माँ की लाज बचाने को
आत्मज्ञान जो करता जाय, रोक नहीं है आने को
भारत माँ में निष्ठा जिनकी, हाथ सभी का गहते हैं
हिन्दू उनको कहते हैं हम हिन्दू उन्हें ही कहते हैं ॥

### राष्ट्रभक्तीची ओळख करून देणे ही जबाबदारी

सध्या संसदेतील चर्चांमध्ये भारतीय युवकांना त्यांच्या 'हिंदू' ओळखीची जाणीव पुन्हा दृढ करण्याची आवश्यकता अधोरेखित झाली आहे. प्राचीन परंपरेत 'हिंदू' हा शब्द केवळ धर्मनाव नसून उत्तम गुणांचा स्वीकार आणि दुर्गुणांचा त्याग अशी जीवनमूल्ये सांगणारी संकल्पना आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सिंधूपासून कन्याकुमारीपर्यंतच्या भारतभूमीला 'पितृभूमी' आणि 'पुण्यभूमी' मानणाऱ्यांना हिंदू म्हटले आहे. परंतु आजच्या राजकीय आणि सामाजिक वातावरणात 'हिंदू राष्ट्र' हा शब्द चर्चेतून लोप पावत असून, जातीय राजकारण व इतिहासाच्या विकृत सादरीकरणामुळे युवकांमध्ये संभ्रम निर्माण होत असल्याचे चित्र आहे. अशा परिस्थितीत त्यांना आपल्या संस्कृतीची, परंपरेची आणि राष्ट्रभक्तीची ओळख करून देणे ही गरज नव्हे तर जबाबदारी ठरते. हनुमंताला जामवंतांनी जशी शक्तीची जाणीव करून दिली, तशीच जाणीव आज युवकांना करून देणे काळाची मागणी आहे. 'वंदे मातरम्' म्हणताना जागणारी मातृभूमीविषयीची निष्ठा पुढील पिढीपर्यंत पोहोचणे अत्यावश्यक आहे.

**रमा देशमुख**/नागपूर

## वाचक पत्रे

### संसदेतून 'वॉकआऊट' हा पळपुटेपणा

काँग्रेसची व एकूणच विरोधी पक्षांची ही वारंवार सवय झाली आहे 'वॉकआऊट'. खरे म्हणजे आता यांना 'वॉकआऊट' केव्हा करणे योग्य ठरते हेही शिकावे लागेल. आपण वारंवार निवडणुका हरत आहोत आणि संख्या घटत आहे याचा जराही विचार हा विरोधी पक्ष व खास करून काँग्रेस करत नाही. महाराष्ट्रात तर उबाठा हा कट्टर हिंदुहृदय म्हणवणारा पक्ष आज सोनियांच्या मागे फिरत आहे. पूर्वजांनी कमावलेले टिकवणे याला सुद्धा हुशारी लागते, ती पण हरवली आहे. पुढची पिढी 'पेग्वीन'सारखी थंड प्रदेशात जाते की काय असे वाटते. काही वर्षांपूर्वी काँग्रेसच नेते मणिपूर... मणिपूर... पंतप्रधान काहीच बोलत नाही असे ओरडत राहिले. आणि एक दिवस ठरवून तब्बल दीड तास मोदी केवळ मणिपूर हाच विषय घेऊन बोलले होते व तेव्हा काँग्रेसचे सर्व नेते आधीच वॉकआऊट करून गेले होते. राहुल गांधी तर पत्रपरिषदेत, मला संसदेत बोलू देत नाही असे म्हणतात अन् त्यांच्या राजकीय सल्लागाराने लिहून दिलेले तेवढेच बोलतात. स्वत:चे काहीच नाही. त्यांची बहीण आपल्या भावाची बाजू घेते, पण त्याला ''थोडे शिक'' असेही म्हणत नाही. संसदेचे प्रत्येक अधिवेशन हे केवळ काँगेसमुळेच बिनाचर्चेचे व वाया जाते. यासाठी काँग्रेसला जबर दंड व्हायला हवा. यावेळी पण केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना चार प्रश्न विचारण्यात आले होते. त्याचे उत्तर देण्याच्यावेळी नेमके विरोधी पक्षांनी वॉकआऊट केला. आता बाहेर बोलताना म्हणतील, ''अमित शाह डर गये, मेरे सवाल का जवाब नहीं दिया'' वगैरे. भारतीय जनतेने अमित शाह यांचे भाषण पूर्ण ऐकले आहे. त्यामुळे कितीही आरडाओरड यांनी केली तरी काँग्रेसकडे कोण लक्ष देणार? एक पूर्वज कमवतो आणि नंतर चार पिढ्या त्यांच्याच नावावर जगतात हे आपण बघितले आहे. त्यामुळे उत्तर ऐकून घेण्याचा धीर, संयम विरोधी पक्षनेत्यात असावा. एकूणच विरोधकांनी केवळ मोदी विरोध न करता देशासाठी जे काही चांगले मोदी करतात त्याला पाठिंबा द्यावा. अन्यथा जनतेने त्यांना सत्तेतून तसेही 'वॉकआऊट' केले आहेच व असेच वागत राहिले तर 'फूट'आऊटही करण्याची ताकद आहे.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१**
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# अवैध रेती वाहतूक करणाऱ्या हायवाच्या धडकेत एकाचा मृत्यू

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १६ डिसेंबर-**

मुदखेड येथील सुवर्ण कारागीर संतोष किशन टाक हे दि. १६ डिसेंबर रोजी सकाळी बारडच्या श्री. शितला देवीचे दर्शन घेऊन मुदखेडला परत येत असताना बारड जाणाऱ्या रस्त्यावर त्यांना अवैध वाहतूक करणाऱ्या हायवा ने उडवले. त्यांचा नांदेड येथील रुग्नालयात ताबडतोब नेण्यात आले पण उपचारा दरम्यान त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. आपल्या मित्रासोबत दर मंगळवारी नित्य नियमाने देवीच्या दर्शनासाठी बारडला जात होते. दि.१६ डिसेंबर रोजी सकाळी ९ च्या दरम्यान ही दुर्दैवी घटना घडली आहे. एका अज्ञात अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या हायवाने पहिले उडवले तर दुसऱ्या अज्ञात हायवाने चीरडले होते. रुग्णवाहिनीने त्यांना नांदेड येथे खाजगी रुग्णालयांत दाखल केले परंतु उपचारा दरम्यान त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.त्यांच्या दुर्दैवी मृत्यु नंतर मुदखेड शहरवासीयांनी कडकडीत बंद पाळला आणि निषेध व्यक्त केला आहे.उद्या शहरातील व परिसरातील सर्वपक्षिय नागरीकांचा मुदखेड तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे.

### अपघाताच्या निषेधार्थ आज सर्वपक्षीय मोर्चा



संतोष किशन टाक हे गजानन कदम यांच्या सराफा दुकानात कामाला होते. अजातशत्रू अशी त्यांची ओळख होती. त्यांचे लहान बंधु स्व. बालाजी टाक यांचा मृत्यु सुध्दा अपघाता मुळेच झाला होता , अपघात झाल्या नंतर एक पाय गमावलेल्या स्व.बालाजी टाक काही वर्षानंतर वाटले होते. स्व. संतोष टाक व त्यांच्या भावाचा अपघातात मृत्यु होणे हा दुर्दैवी योगायोग आहे. स्व. बालाजी टाक यांचे जुन्या गावात सराफा दुकान होते.मुदखेड शहर व परिसरातील अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाळू माफियांचा हा कितवा बळी गेलाय हे महसुली प्रशासनाला च माहित.! याचा जाब महसुलि प्रशासनाला विचाराण्या साठी उद्या दि. १७ डिसेंबर रोजी सर्वपक्षिय मोर्चा तहसील कार्यालयावर काढण्यात येणार आहे.

संतोष टाक यांनी आपल्या भावाच्या दुर्दैवी मृत्युनंतर स्वकष्टाने आपला संसार केला. आपल्या तीन मुलींचे लग्न केले व स्वतः चे घर बाधले आहे. त्यांच्या पश्चात पत्नीसह, तीन मुली, एक मुलगा,नातवंड आहेत. मनमिळावू, होतकरू , कष्टाळू व अजातशत्रू स्व. संतोष टाक यांच्या दुर्दैवी मृत्यू मुळे त्यांच्या परिवारावर दुखः चा डोगंर कोसळला आहे. आप्तस्वकीय व मित्र मंडळी मध्ये हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.वाळू माफियांच्या दोन अज्ञात हायवा गाडीने स्व. संतोष टाक यांचा बळी घेतला आहे. आता महसुली प्रशासन व पोलीस प्रशासन काय कारवाई करणार या कडे शहरातील व परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# वाळूची चोरटी वाहतूक करणारा ट्रॅक्टर पकडला;पाच लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १६ डिसेंबर-**

धनदांडग्यांचं काळ्यावाळूविणा अडत नाही आणि गोरगरिबांना पैसे मोजुनही मिळत नाही अन् पिवळी वाळू काही परवडत नाही! असा वाळू विपर्यास सध्या जिकडे तिकडे सुरू असून,शासनस्तरावर महसूल विभागाकडून वाळू घाटाचे लिलाव रखडल्याने याचा मोठ्या प्रमाणावर फटका गोरगरिब घरकुल लाभार्थ्यांना बसत आहे. त्यामुळे या संधीचा फायदा घेण्यासाठी वाळू तस्करांकडून वाळू चोरीच्या विविध क्लृप्त्या लढवल्या जात असल्याचे दिसून येत आहे. त्यापैकीच माहूर तालुक्याच्या डोंगराळ भागातील साकुर-कुपटी या रस्त्यावरील एका नाल्यातून उपसा करून मध्यरात्रीच्या सुमारास विना नंबरच्या फार्मट्रेक कंपनीच्या ट्रॅक्टर मध्ये अवैध रित्या वाळू भरून विक्रीसाठी नेत असताना महसूलच्या पथकातील तलाठ्यांनी पकडून माहूरच्या तहसील कार्यालयात पाच लाखाचा मुद्देमाल जमा केल्याच्या कारवाईची घटना दि.१५ रोजी रात्री ११च्या सुमारास घडली आहे.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोन्तूंला तसेच माहूरचे तहसीलदार अभिजीत जगताप व नायब तहसीलदार कैलास जेठे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात ठिकठिकाणी पैनगंगा नदीपात्रासह नाल्यांमधून वाळू चोरी होऊ नये म्हणून महसूलचे बैठे आणि फिरत्या पथक तैनात करण्यात आले आहे. तरीसुद्धा काही वाळू तस्कर नाल्यामधील वाळू चोरी करण्याचा प्रयत्न करत असल्याची माहिती मिळताच



दि.१५ डिसेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास तहसीलदार अभिजीत जगताप व नायब तहसीलदार कैलास जेठे यांच्या मार्गदर्शनाखाली फिरत्या पथकातील गस्तीवर असलेले ग्राम महसूल अधिकारी पवन यादव, मनोहर चेके, सुनील वनवे, ओमप्रकाश तवर, कोतवाल बंडू चिरंगे, विलास शेडमाके ,संदीप रणमले हे कुपटी ते साकुर रस्त्यावर गस्त घालत असताना त्यांना तेथील नाल्यातून वाळू भरून बाहेर आलेला विना नंबरचा फार्मट्रेक कंपनीचा ट्रॅक्टर त निदर्शनास आला. त्यामुळे सदरील महसूल पथकाने त्यास अडवून पाहणी केली असता त्यामध्ये विनापरवानगी वाळू भरून वाहतूक करत असल्याचे आढळून आल्याने त्यास तात्काळ ताब्यात घेऊन

पाच लाखाचा मुद्देमाल जप्त करत माहूरच्या तहसील कार्यालयात आणून जमा करण्यात आला. विशेष म्हणजे याआधीही अशा धडक कारवाईत इतर ठिकाणांहूनसुद्धा ट्रॅक्टर पकडून तहसील कार्यालयात जमा करण्यात आले आहेत.

माहूर तालुक्यातील पाचही वाळू घाटांची वाळू लिलाव प्रक्रिया रखडल्याने तालुक्यात वाळूच्या मागणीत प्रचंड वाढ झालेली असल्याने, या संधीचे सोने करण्यासाठी वाळू तस्कर जोर मारु लागले असून,नाल्यातून वाळू काढत तब्बल १० हजार रुपये प्रति ब्रास विक्री करण्याचा प्रयत्न करत असल्याने तहसीलदार अभिजीत जगताप यांनी नदीपात्रासह तालुक्यातील प्रत्येक रस्त्यावर गस्त वाढविली असतानाही अधुनमधून वाळू तस्करीच्या घटना उजेडात येत असल्याने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी माहूरच्या पैनगंगा नदी पात्रावरील वाळू घाटांचे तात्काळ लिलाव करावे, अशी मागणी विविध स्वरूपाचे बांधकाम करणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांसह गोरगरिब घरकुल लाभार्थ्यांमधून करण्यात येत आहे.



## आमचा गाव- आमचा विकास आराखडा कार्यशाळेचे आयोजन

**हदगाव** -पंचायत समिती हदगाव येथे मल्लिनाथ हॉटेल नांदेड रोड हदगाव सभागृह येथे दि. १५ डिसेंबर २०२५ रोजी हदगाव तालुक्यातील सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांचे आमचा गाव आमचा विकास आराखडा संबंधी कार्यशाळा संपन्न झाली . कार्यशाळेचे उद्घाटन गटविकास अधिकारी पंचायत समिती हदगाव यांचे हस्ते करण्यात आले सदरी कार्यशाळेत मारुती कदम प्रवीण प्रशिक्षक यांनी कार्यशाळे संबंधी ९ थिम व १७ गोल शाश्वत विकासाचे ध्येय यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले . जगनाथ पिराजी मुंडकर ग्रामपंचायत अधिकारी तथा प्रवीण प्रशिक्षक यशदा यांनी आमचा गाव आमचा विकास २०२६-२७ चा गाव विकासाच्या आराखडा कसा तयार करायचा त्या संबंधी सविस्तर पीपीटी द्वारे सविस्तर मार्गदर्शन केले .शितल कंटाळे प्रवीण प्रशिक्षक तथा सरपंच येवली यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान व ग्रामपंचायत या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन व केले तसेच दिलीप पत्रे प्रवीण प्रशिक्षक यशदा यांनी आराखड्याची स्रोत व विविध योजनेचा सहभाग व आराखडा समितीकडून छाननी करून ई ग्राम शिवराज पोर्टलवर साईडवर अपलोड करायचा सविस्तर मार्गदर्शन केले आहे तसेच विस्ताराधिकारी (पं) व्ही एम मुंडकर यांनीगावव विकासआराखडा संदर्भात मार्गदर्शन केले. सदर प्रशिक्षण बालासाहेब पवार वि.आ.(पं) ,सतिश फुलारी वि.आ.(प) ,सर्व विस्तार अधिकारी, जिल्हा व्यवस्थापक तालुका व्यवस्थापक (ठऋड), तालुका प्रशिक्षण समन्वयक (लेखा सहायक (ठऋड) तसेच इतर कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.सुत्रसंचालन शिवाजी खेडेकर ग्रामपंचायत अधिकारी यांनी केले तर आभार सचिन देशमुख यांनी मानले .

## शंकर धिरडीकर यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकारिणी सदस्य पदी नियुक्ती

**नवीन नांदेड,** -हाडको येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शंकर गंगाराम धिरडीकर यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकारणी सदस्य पदी



नांदेड जिल्हा अध्यक्ष (शहर) ओमप्रकाश पोखरणा यांच्या स्वाक्षरीनिशी दिलेल्या नियुक्ती पत्राद्वारे नियुक्ती करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नांदेड जिल्हा अध्यक्ष ओमप्रकाश पोकर्णा यांच्या अध्यक्षतेखाली नूतन झालेल्या राष्ट्रवादी पार्टीच्या कार्यकारणी निवड यादीत हाडको येथील जेष्ठ नागरिक सामाजिक कार्यकर्ते शंकर गंगाराम धिरडीकर यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वाढीसाठी व पक्षाचे ध्येय धोरण सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी पक्षाला सहकार्य राहील व पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित दादा पवार यांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचाल असा विश्वास आपल्यावर दर्शवून आपली कार्यकारणी सदस्य पदी निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल शंकर धिरडीकर यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## संदिप वेडे यांनी भीमगीत गाऊन महामानवाला केले अभिवादन



**भोकर** -पूर्णेतील गोड गळ्याचा गायक संदीप वेडे उर्फ रॉक स्टार सॅन्डी यांनी उत्कर्ष शिंदे यांच्या संचा सोबत महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी दादर येथे भीमगीत गाऊन महामानवाला अभिवादन केले आहे. पूर्णे येथील गायक संदिप वेडे यांना गायनाची पूर्वीपासूनच आवड आहे चैत्यभूमी दादर येथे गेल्यानंतर प्रसिध्द गायक उत्कर्ष शिंदे यांच्या संचासोबत त्यांना एक गित गाण्याची संधी देण्यात आली तेंव्हा संदिप वेडे हा ये रे भिवा...ये रे भिवा....हे गित गायले उपस्थित भिम अनूययांची दाद मिळवली सूंदर गित सादर केले आहे पूर्णेमध्ये राहून गायनाचे कोणतेही शिक्षण न घेता आपली कला सादर केली.दरवर्षी दादर येथील चैत्यभूमीला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी लाखो भिम अनूयायी हजेरी लावतात उपस्थित भिम अनूयायी समोर संदिप वेडे हा ये रे भिवा.... ये रे भिवा...हे गित आपल्या पहाडी आवाजात गाऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यात आले.

# ज्ञानदान करणारे गुरुजी स्पर्धेतही अव्वल

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. १६ डिसेंबर-**

शिक्षकांमधील सुप्त कौशल्यांना वाव देणे, त्यांच्या व्यावसायिक क्षमतेचा विकास घडवून आणणे तसेच विद्यार्थ्यांना योग्य दिशा देण्यासाठी प्रभावी मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने शिक्षण विभागामार्फत विविध शैक्षणिक स्पर्धाचे आयोजन केले जाते. याच उपक्रमांतर्गत वैयक्तिक करिअर मार्गदर्शन व समुपदेशन या स्पर्धेचे विभागस्तरीय सादरीकरण दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी लातूर येथे पार पडले.



या विभागस्तरीय स्पर्धेत बिलोली येथील उत्कृष्ट साधन व्यक्ती तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कार्ला (खु.) ता. बिलोली येथील मुख्याध्यापक रमेश गायकवाड यांनी आपल्या अभ्यासपूर्ण, प्रभावी आणि विद्यार्थीकें द्वित सादरीकरणाच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले. त्यांच्या सादरीकरणाची दखल घेत त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, वैयक्तिक करिअर मार्गदर्शन व समुपदेशन या स्पर्धेत रमेश गायकवाड हे बिलोली तालुक्यातीलच नव्हे तर संपूर्ण नांदेड जिल्ह्यातील एकमेव राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेले विजेते स्पर्धक ठरले आहेत. त्यांच्या या यशामुळे तालुक्यासह जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भावना निर्माण झाली आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल गट शिक्षणाधिकारी बी. एम. पाटील, शिक्षण विस्तार अधिकारी जयवंतराव काळे यांच्यासह तालुक्यातील विविध मान्यवर, शिक्षणप्रेमी, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व सहकाऱ्यांनी रमेश गायकवाड यांचे अभिनंदन करत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. रमेश गायकवाड यांच्या यशामुळे बिलोली तालुक्याच्या शैक्षणिक गुणवत्तेचा नावलौकिक वाढला असून, त्यांच्या या यशामुळे इतर शिक्षकांनाही मार्गदर्शन व समुपदेशन क्षेत्रात अधिक प्रभावी कार्य करण्याची प्रेरणा मिळत आहे.

# उपविभागीय अधिकाऱ्यांची वर्षभरात मोठी कारवाई ; २३ गंभीर गुन्हेगार तडीपार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ डिसेंबर-**

शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेडचे उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी सन २०२५ या वर्षभराच्या कालावधीत जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या एकूण २३ गुन्हेगारांना तडीपार करण्याची प्रभावी कारवाई केली अ हे.



तडीपार करण्यात आलेल्या गुन्हेगारांवर शस्त्र अधिनियम, पोक्सो आदी गंभीर स्वरूपाचे गुन्हे नोंद असून त्यांचा वयोगट २३ ते ३५ वर्षे इतका आहे. पोलीस ठाण्यानिहाय तडीपार करण्यात आलेल्या गुन्हेगारांची संख्या पुढीलप्रमाणे आहे. नांदेड ग्रामीण १३, इतवारा ६, विमानतळ २, वजिराबाद १, शिवाजीनगर १ अशी एकूण २३ गुन्हेगारांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

या कारवाईसाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक तसेच विद्यमान उपविभागीय पोलीस अधिकारी व्यंजने व शिंदे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# मतमोजणीमुळे किनवटचा आठवडी बाजार सोमवारी भरणार

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १६ डिसेंबर-**

किनवट नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ च्या अनुषंगाने रविवारी (ता. २१ डिसेंबर २०२५ ) मतमोजणीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे किनवटचा आठवडी बाजार रविवार ऐवजी सोमवारी (ता.२२ डिसेंबर २०२५) भरणार आहे ; याची नोंद शहरातील व आसपासच्या सर्व गावातील जनतेंनी घ्यावी असे जाहीर आवाहन नगर परिषदेचे मुख्यधिकारी विवेक कांदे यांनी केले आहे.

किनवट नगर परिषद सार्वत्रिक निवडणूकीसाठी ता. २ डिसेंबर रोजी मतदान झाले होते . त्याची मतमोजणी रविवारी (ता.२१ डिसेंबर २०२५ ) आहे. त्याअनुषंगाने जिल्हादंडाधिकारी, नांदेड यांचे आदेश क्र.२०२५/आरबी-१/डेस्क-२/टे-४/न.प. व न.पं./नि/प्र.क्र.७९/ दि. ११ डिसेंबर, २०२५ या अन्वये किनवट शहरातील दि.२१/१२/२०२५ (रविवार) रोजी भरविण्यात येणारा आठवडी बाजार हा रद्द करुन सदर आठवडी बाजार हा सोमवारी (ता. २२/१२/२०२५ ) भरविण्यात येणार आहे. किनवट शहरातील व आसपासच्या गावातील सर्व जनतेनी व व्यापा-यांनी याची नोंद घ्यावी. असे आवाहन मुख्याधिकारी श्री कांदे यांनी केले आहे.

# छ.शिवाजी महाराज चौकातील सांडपाणी समस्येवर नगरपंचायतकडून तात्काळ उपाययोजना

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १६ डिसेंबर-**

: माहूर शहरातील ठिकठिकाणच्या चौकांपैकी एक प्रमुख आणि महत्त्वाचा चौक समजला जाणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात नळाचे वाल तुटल्यामुळे नालीचे सांडपाणी रस्त्यावर वाहत होते. याबाबत काल समाजमाध्यमांवर शहरातील काही जागरूक नागरिकांच्यावतीने पोस्ट टाकून नगरपंचायत प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले होते. या पोस्टची तात्काळ दखल घेत या गंभीर समस्येवर उपाययोजना करण्यासाठी नगराध्यक्ष फिरोज दोसानी तसेच मुख्याधिकारी विवेक कांदे यांनी तातडीने कार्यवाहीचे आदेश दिले. त्यानुसार कालच दिनांक १५ डिसेंबर रोजी नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून सदरील ठिकाणी साफसफाई करून तात्पुरती पर्यायी व्यवस्था करण्यात आली.

यावेळी बोलतांना नगराध्यक्ष फिरोज दोसानी आणि मुख्याधिकारी विवेक कांदे यांनी,येत्या महिन्याभरात पक्क्या नालीचे बांधकाम करून हा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यात येईल, असे आश्वासन दिले.तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे सुशोभीकरणही लवकरच करण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी उपस्थित जागरूक नागरिकांना आश्वासन देताना सांगितले.




विशेष म्हणजे नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी सोमवारी स्वतः त्या ठिकाणी नगरपंचायत कर्मचाऱ्यांसह भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. त्यांच्या या कार्यतत्परतेबद्दल नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत असून त्यांचे अभिनंदन होत आहे.

दरम्यान, ज्या हॉटेल व्यावसायिकाकडून नालीचे पाणी अडविण्यात आले होते, त्या हॉटेल चालकाची नगरपंचायत प्रशासनाकडून कानउघाडणी करून त्याला तंबी देण्यात आली असून, यापुढे अशा प्रकारचे कृत्य होऊ नये, अशी अपेक्षा स्वच्छता प्रेमी नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# व्यंकटेश मामीलवाड यांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १६ डिसेंबर-**

आमदार हेमंत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक १६ डिसेंबर २०२५ रोजी आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या साक्षीने शिवसेना (शिंदे गटा) पक्षामध्ये युवा सैनिक डॉ. व्यंकटेश साहेबराव मामीलवाड हेअसंख्य युवासैनिक-शिवसैनिकांच्या समवेत जाहीर प्रवेश केला आहे.

डॉ. व्यंकटेश मामीलवाड हे आपले वैद्यकीय शिक्षण पूर्ण करत सामाजिक जाण ठेवून समाजकार्य करण्याची प्रचंड इच्छाशक्ती उराशी बाळगून समाजकारणाबरोबरच राजकारणातही हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे विचार सोबत घेऊन पक्षाच्या बळकटीसाठी युवकांच्या संघटनातून पक्षास बळकट



करण्यासाठी माननीय आमदार हेमंत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे .

यावेळी नांदेड दक्षिणचे लोकप्रिय आमदार आनंदराव पाटील बोंढारकर,उत्तरचे आमदार बालाजीराव कल्याणकर,आमच्या मातोश्री सौ. राजश्रीताई पाटील, विनय पाटील गिरडे, उमेश मुंडे, गंगाप्रसाद बडूरे,शहरप्रमुख तुलजेश यादव,कृष्णा पांचाळ,पप्पु गायकवाड उपस्थिती होती

## प्रा.निखिल चव्हाण यांना टोलोसा विद्यापीठाची डॉक्टरेट

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी , दि. १६ डिसेंबर-**

शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्याबद्दल प्रा.निखिल चव्हाण यांना टोलोसा विद्यापीठाकडून डॉक्टरेट (Doctorate) पदवी प्रदान करण्यात आली आहे. शिक्षणाच्या गुणवत्तावृद्धीसाठी त्यांनी राबवलेले उपक्रम,



नाविन्यपूर्ण शैक्षणिक संकल्पना आणि सामाजिक बांधिलकी याची दखल घेत विद्यापीठाने हा सन्मान प्रदान केला.

डॉ.निखिल चव्हाण यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक शिक्षणपद्धती, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि मूल्याधिष्ठित शिक्षणावर भर दिला आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी मिळाली असून शिक्षकवर्गालाही नवी दिशा मिळाली आहे. .त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले त्या बद्दल सर्वच स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# मातंग समाजाच्या न्याय हक्कांसाठी विधान भवनात आवाज

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. १६ डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्यातील 'अनुसूचित जाती' प्रवर्गात समाविष्ट असलेल्या मातंग समाजाचा विकास आज ही अपेक्षित पातळीवर झालेला नसल्याचे वास्तव पुन्हा एकदा समोर आले असून, या ज्वलंत प्रश्नाला नायगांव तालुक्याचे लोकप्रतिनिधी आमदार राजेश पवार यांनी थेट विधानभवनाच्या सभागृहात वाचा फोडली आहे. नागपूर येथे सुरू असलेल्या राज्याच्या हिवाळी अधिवेशनात त्यांनी 'एससी' प्रवर्गातील मातंग समाजाचा 'अ, ब, क, ड' या उपवर्गीकरणात समावेश करण्याबाबत तारांकित प्रश्न उपस्थित



केला.

स्वातंत्र्याला सात दशके उलटूनही एससी प्रवर्गाती ल काही समाज विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिले असून, मातंग समाज हा त्यातील सर्वाधिक वंचित घटक असल्याचे अनेक अहवाल आणि न्यायालयीन निरीक्षणांतून स्पष्ट झाले आहे. माननी य सर्वोच्च न्यायालयानेही अनुसूचित जातीतील उप वर्गीकरणाची आवश्यकता अधोरेखित करत, लोक संख्येच्या प्रमाणात न्याय्य लाभ मिळावा, असे स्पष्ट मत मांडले आहे.

तथापि, राज्य शासनाकडून अद्यापही एससी प्रवर्गाच्या उपवर्गीकरणाबाबत ठोस निर्णय घेतला जात नसल्यामुळे मातंग समाजात तीव्र असंतोष आहे. याच पार्श्वभूमीवर लहुजी सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णू भाऊ कसबे यांनी आपल्या सहकाऱ्यां सह मुंबई ते नागपूर असा तब्बल ४८ दिवसांचा संघर्षमय पदयात्रा प्रवास करत हिवाळी अधिवेशना च्या ठिकाणी धडक दिली. नागपूर शहर संपूर्णतः पिवळ्या झेंड्यांनी व्यापले गेले होते,हे या आंदोलना ची तीव्रता दर्शवणारे चित्र होते.

या संपूर्ण आंदोलनाची आणि समाजाच्या वेदनेची दखल घेत, आमदार राजेश पवार आमदार जितेश अंतापूर सह आमदार आमित गोरखे यांनी देखील 'विधान भवनात' नायगांव तालुक्यासह राज्यातील सकल मातंग समाजाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात विकास व्हावा, यासाठी एससी प्रवर्गात 'अ, ब, क, ड' असे उपवर्गीकरण तातडीने लागू करावे, अशी ठोस मागणी तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून मांडला आहे

आ.राजेश पवारांनी समाजाच्या शैक्षणिक,आर्थिक व सामाजिक मागासलेपणावर बोट ठेवत, शासनाने याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे अत्यावश्यक असल्याचे स्पष्ट केले. त्यांच्या या ठाम भूमिकेमुळे नायगांव तालुक्यासह संपूर्ण मातंग समाजात आनंद व आशेचे वातावरण निर्माण झाले असून, समाजबांधवांनी त्यांच्या या भूमिकेचे स्वागत केले आहे.

मातंग समाजाच्या विकासासाठी विधानभवनात उठविलेला हा आवाज केवळ प्रश्न नसून, तो न्याय, हक्क आणि समानतेसाठीचा संघर्ष असल्याची भावना मातंग समाजातून व्यक्त होत आहे.

# अंबाजोगाई लातूर रोडवरील स्कापिओ व हुंडाई एक्सेंटचा भीषण अपघात

## तीन ठार तर आठ जण गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१६ डिसेंबर**

अंबाजोगाई लातूर रोडवरील जिल्हा सरहद्दीवर स्कार्पिओ व हुंडाई एक्सेंट

च्या झालेल्या भीषण अपघातात तीन जण ठार तर आठ जण गंभीर रित्या जखमी झाल्याची घटना सोमवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास घडली असून सर्व जखमीवर लातूर येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आसुन या अपघाताने पुन्हा एकदा चार पदरी रस्त्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या भीषण अपघाता विषयी प्राप्त माहिती अशी की, १५ डिसेंबर सोमवार च्या रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास लातूर हुन (अंबाजोगाई) सायगाव च्या दिशेने निघालेली MH12 CY 7022 क्रमांकाची होंडाई एक्सेंट ही कार लातूर– बीड जिल्हा सरहद्दी वरील बर्दापूर नजीक आली असता समोरून अंबाजोगाई होऊन लातूरच्या दिशेने निघालेल्या MH24 V 7771 स्कापिओ गाडीची समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघाता नंतर बर्दापूर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक कांबळे व त्यांची टीम तात्काळ घटनास्थळी धावली व अपघातातील मयत अमित सुभाष राऊत वय ३६ वर्ष राहणार सोमवंशी नगर आर्वी तालुका जिल्हा लातूर, पृथ्वी रमाकांत जाधव वय २० वर्ष राहणार खानापूर तालुका रेणापुर जिल्हा लातूर, निजामुद्दीन फसीयुद्दीन शेख व ३७ वर्ष राहणार सोमवंशी नगर आर्वी तालुका जिल्हा लातूर या तीन जणांचा उपस्थित जनसमुदायाच्या मदतीने बाजूला काढून उर्वरित अश्विनी गंगासागर स्वामी व २८ वर्ष, प्राची गंगासागर स्वामी वय ०७ वर्ष, वीरभद्र उमाकांत स्वामी वय ४० वर्ष, सरस्वती वीरभद्र स्वामी वय ३२ वर्ष, महेश रमाकांत स्वामी वय ३१ वर्ष, गणेश रमाकांत स्वामी वय २५ वर्ष सर्व राहणार आरजखेडा तालुका रेणापूर जिल्हा लातूर, दिशान इस्माईल सय्यद वय २० वर्ष राहणार काळे गल्ली लातूर, अरबाज रहमत शेख वय २१ वर्ष राहणार रेणुका नगर लातूर या आठ गंभीर जखमीला सरकारी दवाखाना लातूर येथे उपचारासाठी रवाना केले.सर्व मयत व्यक्तीचे स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात विच्छेदन सुरू आसल्याची माहिती बर्दापूर येथील पोलीस उपनिरीक्षक कांबळे यांनी दिली आहे.

अपघाताने एकदा चार पदरी रस्त्याचा प्रश्न ऐरणीवर

लातूर हुन अंबाजोगाई कडे जाणारा राष्ट्रीय महामार्गाचा रस्ता लातूर बीड जिल्हा सरहद्दीपर्यंत चार पदरी आणि पुढे अंबाजोगाईपर्यंत दोन पदरी असल्या कारणाने जिल्हा सरहद्दी पर्यंत येणाऱ्या वाहनाची वाहतुक एकतर्फी असून पुढे अंबाजोगाई पर्यंत ही वाहतूक समोरासमोर होत असल्याने यापूर्वी अनेक वेळा या रस्त्यावर अपघात होऊन अनेकांचे बळी गेलेले आहेत त्यामुळे जिल्हा सरहद्दी पासून लोखंडी सावरगाव पर्यंत हा रस्ता चार पदरी बनवण्यात यावा अशी मागणी वारंवार होत असून काही महिन्या पूर्वीच केंद्रीय रस्ते विकास मंत्री माननीय नितीन गडकरी यांनी या रस्त्याच्या चार पदरी रस्त्याच्या कामाला मंजुरीही दिलेली आहे.सदर चार पदरी रस्त्याच्या कामाचे प्रस्ताव शासन दरबारी गेलेला असून काल झालेल्या या अपघाताने पुन्हा एकदा या चार पदरी रस्त्याचा प्रश्न ऐरणीवर आले आहे असेच म्हणावे लागेल.

# होळच्या शिवछत्रपती क्रीडा व्यायामशाळेचे मल्ल जिल्हा कुमार कुस्ती स्पर्धेत चमकले



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ डिसेंबर**

आष्टी येथे झालेल्या जिल्हास्तरीय कुमार कुस्ती स्पर्धेत केज तालुक्यातील होळ येथील शिवछत्रपती क्रीडा व्यायामशाळेच्या मल्लांनी उल्लेखनीय यश संपादन करून नाव उज्ज्वल केले आहे.

या स्पर्धेत यशराज रत्नाकर मुंडे यांनी ८० किलो वजन गटात उत्कृष्ट कुस्ती दाखवत प्रथम क्रमांक पटकावला. तसेच, शिवम दत्ता धोंगडे यांनी ६० किलो वजन गटात दमदार कामगिरी करत छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कुमार कुस्ती स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. या यशाबद्दल दोन्ही पैलवानांचे क्रीडा प्रेमी, प्रशिक्षक, सहकारी मल्ल तसेच शिवछत्रपती क्रीडा व्यायामशाळेच्यावतीने अभिनंदन करण्यात आले. आगामी राज्यस्तरीय तसेच कुमार महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# अमृतने घडवला उद्योजकतेचा प्रत्यक्ष अनुभव; केज प्रशिक्षणार्थींची लातूर एमआयडीसी औद्योगिक भेट

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१६ डिसेंबर**

महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था असलेल्या अमृतच्या पुढाकारातून आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED) यांच्या सहकार्याने केज येथे सुरू असलेल्या उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षणार्थींसाठी एक प्रेरणादायी व मार्गदर्शक औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली.

हा २१ दिवसांचा उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम २१ नोव्हेंबर ते १६ डिसेंबर या कालावधीत सुरू असून, त्याचाच एक महत्त्वाचा भाग म्हणून सोमवार, दिनांक १५ डिसेंबर रोजी लातूर एमआयडीसीतील विविध उद्योगांना प्रत्यक्ष भेट देण्यात आली. सदर प्रशिक्षणात एकूण ३८ प्रशिक्षणार्थी सहभागी असून, सर्व प्रशिक्षणार्थींनी या औद्योगिक भेटीत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या औद्योगिक भेटीदरम्यान प्रशिक्षणार्थींना गाईच्या शेणापासून तयार होणारे लाकूड व गौर्या, नारळाच्या संपूर्ण भागापासून तयार होणाऱ्या काथ्या, पायपुसण्या, कोकोपीट व इतर उत्पादने, तसेच गारमेंट उद्योगातील प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रिया यांचे सखोल व प्रात्यक्षिक ज्ञान मिळाले.



या भेटीत अमृत बीड जिल्हा उपव्यवस्थापक श्री. दिगंबर जोशी, एमसीईडी बीड प्रकल्प अधिकारी श्री. दत्तात्रय क्षीरसागर, एमसीईडी लातूर प्रकल्प अधिकारी श्री. गायकवाड, तसेच अमृत लातूर जिल्हा व्यवस्थापक श्री. शुभम मुळजकर उपस्थित होते.

प्रथम गाईच्या शेणापासून लाकड्या व गौर्या तयार करणाऱ्या उद्योगास भेट देण्यात आली. येथे उद्योगपती श्री. चौधरी यांनी कच्चा माल, वापरण्यात येणारी मशिनरी, उत्पादन प्रक्रिया, खर्च रचना, विक्री व बाजारपेठ याबाबत सविस्तर माहिती दिली. प्रशिक्षणार्थींनी विविध प्रश्न विचारून उद्योग उभारणीची संपूर्ण प्रक्रिया समजून घेतली.

यानंतर बंजारा गारमेंट्स या उद्योगास भेट देण्यात आली. येथे श्री. अभिषेक यांनी शर्ट, टी-शर्ट, पॅन्ट आदी वस्तूंच्या निर्मितीची प्रक्रिया, कच्चा माल, कामगार व्यवस्थापन व विक्री यंत्रणा याबाबत प्रत्यक्ष माहिती दिली. उत्पादन प्रक्रिया जवळून पाहण्याची संधी मिळाल्याने प्रशिक्षणार्थी विशेष प्रभावित झाले.

त्यानंतर श्री. तुषार सावंत यांनी नारळपाणी काढल्यानंतर उरलेल्या नारळाच्या सर्व भागांपासून काथ्या, पायपुसण्या, कोकोपीट व विविध उपयोगी वस्तू कशा तयार केल्या जातात याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवले. कचऱ्यातून मूल्यनिर्मिती ही संकल्पना प्रशिक्षणार्थींना विशेष प्रेरणादायी ठरली.या संपूर्ण औद्योगिक भेटीदरम्यान श्री. दिगंबरजी जोशी यांनी प्रशिक्षणार्थींच्या वतीने उद्योजकांना कच्चा माल उपलब्धता, प्रक्रिया, मशिनरी, खर्च मांडणी व विक्री किंमत निर्धारण यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रश्न विचारून सखोल मार्गदर्शन घेतले. यामुळे प्रशिक्षणार्थींचा आत्मविश्वास लक्षणीयरीत्या वाढल्याचे दिसून आले.या एकदिवसीय एमआयडीसी औद्योगिक भेटीमुळे प्रशिक्षणार्थींमध्ये स्वतःचा उद्योग सुरू करण्याची प्रेरणा, आत्मविश्वास व कार्यउत्साह निर्माण झाला असून, केज येथे सुरू असलेल्या उद्योजकता विकास प्रशिक्षण शिबिरास अत्यंत चांगला प्रतिसाद मिळत आहे. यावेळी समस्त ब्राह्मण संघर्ष समितीचे संस्थापक श्री. धनंजयजी कुलकर्णी (केज) तसेच न्यूज वनचे संपादक पत्रकार श्री. रामदास तपसे हे आवर्जून उपस्थित होते.

# पोलीस पाटील रिक्त पदे आरक्षण सोडतीबाबत निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ डिसेंबर**

परळी वै उपविभागातील पोलीस पाटील पदाची रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने गावनिहाय आरक्षण निश्चितीबाबत जिल्हांदडाधिकारी बीड यांनी दि. १४.१२.२०२५ हे आदेश निर्गमित केलेले आहे. सदर रिक्त पदे भरण्यासंदर्भात पोलीस पाटील रिक्त पदाचे प्रवर्गनिहाय समांतर आरक्षण घोषित करण्यात येणार आहे.

जिल्हादंडाधिकारी बीड यांचे दि. १४.१२.२०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार पोलीस पाटील भरती प्रक्रियेचे अनुषंगाने गावनिहाय आरक्षण निश्चितीबाबत खालील प्रमाणे वेळापत्रक ठरवुन देण्यात आलेले आहे.

भरती प्रक्रियेचे टप्पे:– १५ ते २० डिसेंबर २०२५ जाहिर नोटीस प्रसिध्द करणे व गावनिहाय आरक्षण निशित करणे. दि. २२ डिसेंबर २०२५ ते २६ डिसेंबर २०२५ आरक्षणावर अक्षेप. ३० डिसेंबर २०२५ प्राप्त आक्षेपावर निर्णय घेऊन गावनिहाय अंतिम आरक्षण जाहिर करणे

वेळापत्रकाच्या अनुषंगाने पोलीस पाटील रिक्त पदे आरक्षणाची सोडत काढून निश्चित करावयाची आहे. त्याकरीता दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ०१.०० वाजता मध्यवर्ती प्रशासकीय इमारत तहसील कार्यालय परळी वै येथे सभा आयोजित केलेली आहे. तरी इच्छुक नागरिकांनी आरक्षण सोडत काढण्याकरीता हजर राहावे. आरक्षण निश्चित झाल्यानंतर आक्षेप किंवा हरकत विचारात घेण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.असे परळी वैद्यनाथचे उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## डॉ. लक्ष्मण उलगडे लिखित 'श्री १०८ शिवानंद शिवाचार्य तमलुरेश्वर' महाग्रंथ नोव्हेंबर २०२६ मध्ये प्रकाशित होणार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ डिसेंबर**

समस्त भाविक भक्तांसाठी अत्यंत आनंदाची व अभिमानाची बाब म्हणजे आदरणीय गुरुवर्य ष.ब्र.श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महास्वामी तमलुरेश्वर यांच्या दिव्य जीवनकार्यावर आधारित भव्य व सखोल असा महाग्रंथ नोव्हेंबर २०२६ मध्ये प्रकाशित होणार आहे. या महाग्रंथाचे लेखन प्रा. डॉ. लक्ष्मण काशीनाथ उलगडे करत असून, हा ग्रंथ गुरुभक्तांसाठी ज्ञान, प्रेरणा आणि भक्तीचा अमूल्य ठेवा ठरणार आहे.

# ई–पीक पाहणीसाठी समिती गठित

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ डिसेंबर**

खरीप हंगाम २०२० मध्ये विहित मुदतीत ई–पीक पाहणी (DCS) नोंद न झालेल्या शेतकऱ्यांच्या पीकाची ऑफलाईन पाहणी करण्यासाठी उप विभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालीप्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

उपविभागीय अधिकारी अध्यक्ष, तहसीलदार सदस्य, गटविकास अधिकारी सदस्य, तालुका कृषी अधिकारी सदस्य असून समितीने खालीलप्रमाणे कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण करण्यात यावी.

फेरचौकशीः ज्या शेतकऱ्यांना काही कारणांमुळे पिकांची नोंद करता आली नाही आणि सदर नोंद ७/१२ उता–यावर आली नाही, त्यांच्याबाबत प्रत्यक्षात पीक असल्याची फेरचौकशी करून अहवाल दिनांक १५ जानेवारी, २०२६ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा.

सर्व उप विभागीय अधिकारी (अध्यक्ष) यांनी समितीच्या कामकाजाचा दररोज आढावा घ्यावा आणि दैनिक अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास व पणन विभागास सादर करावा.

समितीने करावयाच्या कार्यवाहीबाबतच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्तरावरुन लवकरच निर्गमित करण्यात येतील.

या अहवालानुसार पणन विभागाने पीक खरेदी करण्याबाबत पुढील आवश्यक कार्यवाही तात्काळ करावी. सदर विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन, सर्व संबंधितांनी तातडीने कार्यवाही करावी असे निवास उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# सण उत्सवानिमित्त वाद्य वाजविण्याचे दिवस जाहिर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ डिसेंबर**

उत्सव कालावधीत पंधरा (१५) दिवस सकाळी ०६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत वाद्य वाजविण्यास परवानगी देण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी ध्वनी प्राधिकरण तथा जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेशी सल्लामसलत करुन दिवस निश्चित करुन त्याची आगाऊ यादी ०१ जानेवारी किंवा तत्पूर्वी जाहीर करणेबाबत नमूद केले आहे.

जिल्हयात ध्वनी प्रदुषण नियंत्रण प्राधिकरण यांचे कार्यालय नसल्याने पोलीस अधिक्षक, बीड यांनी बीड जिल्हयात ०१ जानेवारी २०२६ ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत सकाळी ६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत वाद्य वाजविण्याची परवानगी देण्यासाठी १५ दिवस प्रस्तावित केले आहेत.

बीड जिल्ह्यात ध्वनी प्रदुषण नियम २००० मधिल नियम ३ व ४ तसेच ध्वनि प्रदुषण (नियंत्रण व नियमन) नियम २००० मधिल अटी व शर्तीस अधिन राहून खालील प्रमाणे नमुद दिवशी ०१ जानेवारी २०२६ ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधी दरम्यान सकाळी ०६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत ध्वनीची मर्यादा राखून वाद्य वाजविण्यास परवानगी देण्यात येत आहे.

शिवजंयती १ दिवस, ईद ए मिलाद १ दिवस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती १ दिवस, १ मे महाराष्ट्र दिन १ दिवस, गणपती उत्सव चार दिवस अनंत चतुर्दशीसह शेवटचे तीन दिवस, नवरात्री उत्सव २ दिवस अष्टमी आणि नवमी, दिपावली एक दिवस, लक्ष्मीपुजन, ख्रिसमस एक दिवस, ३१ डिसेंबर १ दिवस, उर्वरित दोन दिवस महत्वाच्या कार्यक्रमासाठी राखीव असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# नवनिर्मितीला चालना देणारे तंत्रशुद्ध प्रशिक्षण महिला बचत गटांना देऊ– सुधीर लातुरे

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१६ डिसेंबर**

धर्मवीर सामाजिक युवा प्रतिष्ठान संचलित श्री. वैद्यनाथ भक्ती शिवाजी महाराज, भारत माता यांच्या प्रतिमांचे तसेच पवित्र भगव्या ध्वजाचे पूजन करून करण्यात आली. यानंतर सामूहिक हनुमान चालीसा पठणाने ईश्वर स्तुती मंत्राने सार' हे पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला.

आपल्या भाषणात वक्त्यांनी श्री. वैद्यनाथ भक्ती मंडळाच्या कार्याचा गौरव करत सांगितले की,



मंडळाचा चौथा वार्षिक उत्सव मोठ्या स्नेह मिलन कार्यक्रम उत्साहात कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय येथे संपन्न झाला. युवकांच्या संघटनेतून धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्य सातत्याने राबविणारे हे भक्ती मंडळ समाजासाठी प्रेरणादायी कार्य करत असल्याचे प्रतिपादन डॉ. भरत मुंडे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात केले.

प्रा.डॉ.शाम नेरकर सर यांनी देवांगण मिरववनिया ! अंगोपचार पुरवणीया ! करावया म्हणीया ! शोभती हात !! या ज्ञानेश्वर महाराजांच्या ओवी प्रमाणे या सर्व भक्ती मंडळाच्या सेवेकऱ्याचे कार्य आहे गौरव उद्गार व्यक्त केले.

कार्यक्रमाची सुरुवात प्रभू श्रीराम, प्रभू वैद्यनाथ, छत्रपती संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

या वेळी दत्ताप्पा ईटके गुरुजी, अभयकुमार ठक्कर, विज्ञान मुनीजी, बाळासाहेब देशमुख, ह. भ. प. परमेश्वर महाराज सोडगीर, डॉ. भरत मुंडे, डॉ. विवेक दंडे, डॉ. बालाजी फड, डॉ. दीपक पाठक, डॉ . रविंद्र ईटके ,डॉ . तुषार पिंपळे,उत्तम माने, ॲड. राजेश्वर देशमुख, ह. भ. प. ॲड. दत्तात्रय आंधळे, प्रा. डॉ. नेहरकर, नंदकिशोर बियाणी,बंडू गरुड, ईश्वर प्रभू, रमेश चौंडे, सुरेश टाक, राजेंद्र सोनी, प्रा.प्रवीण फुटके, संजय खाकरे, किरण धोंड ,विष्णुपंत कुलकर्णी, अनंत बिनवडे आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांचा श्री. वैद्यनाथ भक्ती मंडळाच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ व 'वैद्यनाथ

परळी शहरातील विविध हिंदू धर्मीय मंदिरांची दर रविवारी स्वच्छता मोहीम राबविण्यात मंडळाचे सदस्य सातत्याने अग्रेसर आहेत. धार्मिक आस्था जपत समाजहिताचे कार्य करणारे हे युवक इतरांसाठी आदर्श असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैद्यनाथ भक्ती मंडळाचे सेवेकरी प्रा. अतुल दुबे यांनी केले, तर प्रास्ताविक प्रा. वैजनाथ कानगुले यांनी मांडले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. वैद्यनाथ भक्ती मंडळाच्या सर्व सेवेकरी बांधवांनी अथक परिश्रम घेतले. मोठ्या संख्येने भाविक, नागरिक व युवक उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

# रोटरी क्लब व ग्राम ऊर्जा फाउंडेशनच्या वतीने महिला मेळावा



**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१६ डिसेंबर**

नवनिर्मितीला चालना देणारे तंत्रशुद्ध प्रशिक्षण महिला बचत गटांना उपलब्ध करून दिले जाईल. तसेच उत्पादनाचे प्रदर्शन व बाजारपेठ उपलब्धीसाठी रोटरी पुढाकार घेईल.असे प्रतिपादन रोटरी क्लबचे प्रांतपाल सुधीर लातुरे यांनी केले.

येथील रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी, ग्राम ऊर्जा फाउंडेशन,यूथ एड, पुणे, डॉ के.आर.श्रॉफ फाउंडेशन व सृजन ॲग्रो टेक प्रोड्युसर कंपनी यांच्या वतीने महिला उद्योजकता घेण्यात आला.

या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी रोटरीचे प्रांतपाल सुधीर लातुरे होते.तर प्रमुख अतिथी म्हणून तहसीलदार विलास तरंगे,उपविभागीय कृषी अधिकारी राहुल गायकवाड, दादासाहेब गायकवाड (अध्यक्ष, ग्राम उर्जा फाऊंडेशन अंबाजोगाई)रोहीणी पाठक (अध्यक्ष रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी),रोहीणी भरड (कृषी विज्ञान केंद्र, अंबाजोगाई) विलास जगताप (माविम),सूर्यभान जाधव (कोरो इंडिया फेलो) यांच्यासह ग्राम ऊर्जा फाउंडेशनचे सचिव अशोक हातागळे, वैजिनाथ इंगोले रोटरी चे उमेश तापडिया, संगीता लातुरे यांची उपस्थिती होती.

या मेळाव्यात अंबाजोगाई तालुक्यासह परिसरातील विविध गावांमधील सुमारे २०० महिला उद्योजकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. मेळाव्यात महिलांनी स्वतः तयार केलेल्या अन्नप्रक्रिया, कृषीपूरक व हस्तकला उत्पादनांच्या विक्री व प्रदर्शनाला नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. ग्राम ऊर्जा फाउंडेशनमार्फत उपलब्ध रोजगार, उद्योजकता विकास, प्रशिक्षण व शासकीय योजना संदर्भातील सेवांची माहिती उपस्थित महिलांना देण्यात आली. यावेळी महिला उद्योजकांनी आपल्या उद्योग विषयक संकल्पना व लागणारी मदत याची माहिती विषद केली.शीला कुणाल जोगदंड, सुरेखा कुंडगर, सुरेखा कचरे, सरस्वती नखाते राजेश्वरी सूर्यवंशी, आरती दहीवाड यांचा अनुक्रमे प्रथम, द्वितीय, व तृतीय क्रमांकाची बक्षिसे देऊन सन्मान करण्यात आला.दीपप्रज्वलनाने कार्यक्रमास प्रारंभ झाला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक दादासाहेब गायकवाड यांनी केले.संचालन संजिवनी गुळभीले यांनी तर उपस्थितांचे आभार शामल राउत यांनी मानले.

# प्रा. बालाजी बोडके यांना पीएच.डी प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१६ डिसेंबर**

सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील इतिहास



प्रमुख प्रा.बालाजी बोडके यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत पीएचडी प्रदान करण्यात आली आहे.

प्रा. बालाजी बोडके यांनी प्रा. डॉ.प्रशांत साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'पानिपत (१७६१) युद्धाची मीमांसा' या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शोध प्रबंध सादर केला होता. त्यांच्या संशोधन कार्याची दखल घेऊन त्यांना पीएच.डी. प्रदान केली आहे.

प्रा.बालाजी बोडके यांच्या यशाबद्दल म.शि. प्र.मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह महाविद्यालय विकास समिती सदस्य एड. बी. आर. डक, प्राचार्य डॉ. जी.के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. एन. के. मुळे, उपप्राचार्य डॉ. एम.ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे ,प्रा. सुदर्शन स्वामी यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# सुशासन सप्ताहानिमित्त सर्व विभागांनी समन्वयाने विशेष उपक्रम राबवा

## जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या बैठकीत अधिकाऱ्यांना सूचना

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ डिसेंबर**



सुशासन सप्ताहांतर्गत प्रशासन गाव की ओर या उपक्रमाअंतर्गत तहसील व पंचायत समिती स्तरावर नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करणे तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ व सेवा थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने दि. १९ ते २५ डिसेंबर २०२५ या कालावधीत सुशासन सप्ताह साजरा करण्यात येणार आहे.

या कालावधीत तहसील व पंचायत समिती यांच्यामार्फत गावपातळीवर समाजाच्या विविध घटकांतील नागरिकांसाठी विशेष मोहिमा, कार्यक्रम, उपक्रम, शिबिरे तसेच महसूल अदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे. सुशासन सप्ताहातील कार्यक्रमांचे नियोजन करताना संबंधित विभागांशी समन्वय साधून कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी तहसीलदार व गटविकास अधिकाऱ्यांना दिले आहेत.

सुशासन सप्ताहाच्या वेळापत्रकानुसार दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी नागरिकांच्या सनदेचे वाचन करून सुशासन सप्ताहाचा शुभारंभ करण्यात येणार आहे. दि. २० डिसेंबर रोजी सामाजिक सहाय्य योजनांचे प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी शिबिरे, पांदण, शेत व शिवार रस्ते मोकळे करणे, महसूल अभिलेख नोंदी, भटक्या व विमुक्त जातींसाठी जात प्रमाणपत्र व शासकीय योजनांचे लाभ देण्यासाठी विशेष शिबिरे, प्रलंबित वारस नोंदी निकाली काढण्याची विशेष मोहीम तसेच अकृषिक जमिनींची स्वतंत्र सातबारा मोहीम राबविण्यात येणार आहे.

दि. २१ डिसेंबर रोजी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उन्नयन योजना, राष्ट्रीय कृषी योजना, सूक्ष्म सिंचन योजना, मनरेगा अंतर्गत फळबाग योजना, भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजना व मृदा आरोग्य योजनांसाठी गावपातळीवर शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. दि. २२ डिसेंबर रोजी अॅग्रीस्टॅक योजनेच्या अंमलबजावणीसाठी शिबिरे, तर दि. २३ डिसेंबर रोजी शबरी आवास योजना, प्रधानमंत्री आवास योजना, मोदी आवास योजना व अटल बांधकाम योजना यांच्या अंमलबजावणीसाठी गावपातळीवर शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. दि. २५ डिसेंबर रोजी दहावीनंतरच्या शिष्यवृत्ती योजना, अनुसूचित जाती-जमाती अत्याचार पीडित अर्थसहाय्य योजना, डॉ. बाबासाहेब स्वाधार योजना तसेच मागासवर्गीय मुला-मुलींसाठीच्या शासकीय योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी विशेष शिबिरे घेतली जाणार आहेत.

याशिवाय दि. १९ ते २५ डिसेंबर २०२५ या कालावधीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत कार्डधारक व नागरिकांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी गावपातळीवर शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. सुशासन सप्ताहाच्या अनुषंगाने कार्यालयांशी संबंधित प्रलंबित अर्ज व तक्रारींचे निवारण करून नागरिकांची कामे पूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. सुशासन सप्ताह कालावधीत राबविण्यात येणाऱ्या सर्व कार्यक्रमांची फोटोसह माहिती पोर्टलवर अपलोड करणे बंधनकारक असून, दररोजचा प्रगती अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा प्रकल्प अधिकारी उमाकांत मोकरे यांच्याकडे सायंकाळी ५ वाजेपर्यंत सादर करावा, असे आदेश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले आहेत. या अहवालात विशेष शिबिरांतर्गत व सीपीजीआरएमएस तसेच राज्य पोर्टलवरील निकाली काढलेल्या सार्वजनिक तक्रारींची संख्या, ऑनलाईन सेवा वितरणाशी जोडलेल्या सेवांची व अर्जांची संख्या, सुशासन पद्धतींचा प्रसार, यशोगाथा व प्रसार कार्यशाळेचा तपशील समाविष्ट करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.




**हिंगोली– हिंगोली नगर पालिकेच्या निवडणुकीनंतर जुनी नगर परिषद कार्यालयाजवळील कल्याण मंडपम् येथे नगर पालिका निवडणुकीनंतर मतदान यंत्र ठेवण्यात आले असून या मतदान यंत्राची सुरक्षा पोलिस विभागाचे अधिकारी व कर्मचारी करीत आहेत. छाया– विजय गुंडेकर**

# गंगा नगर भागात बंद घराचे कुलूप तोडून ७० हजारांचा ऐवज पळविला

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ डिसेंबर**

हिंगोली शहरालगत असलेल्या कारवाडी ग्रामपंचायत अंतर्गत गंगा नगर भागात दोन बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी ७० हजारांचा ऐवज पळविल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करून आरोपीचा शोध सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार शहरालगत गंगानगर भागात दत्ता डोके यांचे निवासस्थान आहे. त्यांच्या बाजूलाच सुधीर पाईकराव यांचे निवासस्थान आहे. मागील दोन दिवसांपूर्वी दोघांचेही कुटुंबीय घराला कुलूप लावून बाहेरगावी गेले होते. घराला कुलूप असल्याचा गैरफायदा घेत चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. यामध्ये चोरट्यांनी घरातील साहित्याची नासधुस केली. त्यानंतर डोके यांच्या घरातील कपाट फोडून त्यातील सोन्याचांदीचे दागिने व रोख रक्कम पळविली. त्यानंतर चोरट्यांनी बाजूलाच असलेल्या पाईकराव यांचय घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. या ठिकाणीही चोरट्यांनी दागिने पळविले. दोन्ही घटनांमध्ये चोरट्यांनी ७० हजारांचा मुद्देमाल पळविला. सोमवारी दि १५ डिसेंबर रोजी डोके कुटुंबीय बाहेरगावाहून परत आले असतांना त्यांना घराचे कुलूप तुटलेले दिसले. घरात चोरी झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी तातडीने हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात माहीती दिली. हिंगोली ग्रामीण पोलस ठाण्याचे पोलिस निरीक्षक श्यामकुमार डोंगरे, जमादार बाळासाहेब खोडवे, आकाश पंडीतकर, आशिष उंबरकर यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. दत्ता डोके यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# उपमहानिरीक्षकांच्या उपस्थितीत पत्रकार-पोलिस क्रिकेट सामना

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ डिसेंबर**



येथील संत नामदेव पोलिस कवायत मैदानावर दि १६ डिसेंबर रोजी नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पत्रकार आणि पोलिस विभाग यांच्यामध्ये क्रिकेटचा सामना झाला.

नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप हे हिंगोली जिल्हा दौऱ्यावर असून सर्व पोलिस ठाण्यांची वार्षिक तपासणी करीत आहेत. यामध्ये पोलिस ठाण्यांचे कामकाज, शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवणे तसेच नागरिक, पत्रकार आणि पोलिस यांच्यामध्ये समन्वय साधत आहेत. याचाच एक भाग म्हणून पत्रकार आणि पोलिस विभागात मंगळवारी क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनीही क्रिकेट सामन्यात सहभागी होत. शहाजी उमाप यांनी नाबाद ७२ धावा केल्या तर पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी उत्कृष्ट गोलंदाजी करीत ४ विकेट घेतल्या. सुरूवातीला पत्रकार संघाने टॉस जिंकत फलंदाजी घेतली. पत्रकार संघाने ८ विकेट गमावत १२२ धावा केल्या. या धावाचां पाठलाग करीत पोलिस विभागाच्या संघाने विजय संपादन केला. यावेळी विजेता संघाला ट्रॉफी तसेच बहाल करण्यात आली तर उपविजेता पत्रकार संघालाही मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी प्रदान करण्यात आली. खेळीमेळीच्या वातावरणात हा सामना पार पडला.



**हिंगोली– नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी हिंगोली जिल्ह्यातील अनेक पोलिस ठाण्यांची पाहणीसाठी हिंगोली दौऱ्यावर असून मंगळवारी येथील संत नामदेव कवायत मैदानावर पत्रकार आणि पोलिस यांच्यात क्रिकेट सामना झाला.यावेळी उमाप यांनी नाबाद ७२ धावा केल्या. उत्कृष्ट फलंदाज म्हणून त्यांना ट्रॉफी प्रदान करतांना पोलिस अधीक्षक कोकाटे, पत्रकारसंघाचे पदाधिकारी, पोलिस अधिकारी आदींची उपस्थिती होती. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### हिंगोली ते शिर्डी पदयात्रा रवाना



हिंगोली– श्री.साई पूर्णानंद सरस्वती स्वामीजी यांच्या कृपा आशिर्वादाने १९ वर्षापासून हिंगोली ते शिर्डी पदयात्रा काढण्यात येते. यावर्षी ही पदयात्रा सोमवारी रवाना झाली असून या पदयात्रेचे लिंबाळा येथील राधाई जिनींगमध्ये स्वागत करण्यात आले. पदयात्रेतील भक्तांना फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी गोवर्धन सारस्वत, हनुमानदास मुंदडा, विजय आप्पा सराफ, संतोष डहाळे आदींची उपस्थिती होती. पदयात्रेमध्ये कैलास कानबाळे, संदीप आप्पा सराफ, विनोद सूर्यवंशी, आनंद चौधरी, विजय शिरोळे, कन्हैया टाक, श्याम बोधनकर, ओम सुनेवाड, रुपेश चिंतोजी, गजानन डोरले यांच्यासह २५ ते ३० साईभक्त सहभागी झाले आहेत. ही पदयात्रा जिंतूर, मंठा, छत्रपती संभाजीनगर मार्गे जाणार असून २४ डिसेंबर रोजी शिर्डी येथे पोहोचणार आहे.

### प्रा. विजय गायकवाड यांना पीएचडी प्रदान



हिंगोली– हिंगोली जिल्ह्यातील खंडाळा येथील जिल्हा परिषद प्रशालाचे मा. से. नि. आदर्श मुख्याध्यापक श्री रामराव शंकरराव गायकवाड यांचा मुलगा प्रा विजय गायकवाड स्व पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय रिसोड यांना नुकतीच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची पीएचडी पदवी प्राप्त झाली. प्रा विजय यांचे प्राथमिक ते दहावी पर्यंतचे शिक्षण स्वतःच्याच गावातील जि. प. प्र. खंडाळा येथे व त्यानंतर ज्युनियर ते पदवी आदर्श कॉलेज हिंगोली तर मास्टर ऑफ लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स व एम फिल हे पदव्युत्तर शिक्षण नागपुर विद्यापीठ येथे झाले. त्यांनी कॉन्ट्रीब्युशन ऑफ द लायब्ररी इन द टीचिंग अँड रिसर्च वर्क ऑफ प्रोफेसर्स इन एडेड कॉलेजेस अँफीलेटेड टू संत गाडगेबाबा अमरावती युनिव्हर्सिटी अमरावती : अ स्टडी या विषयावर प्राचार्य डॉ निलेश एन गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आपले संशोधन कार्य पुर्ण केले. त्यांनी आतापर्यंत वेगवेगळ्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदामध्ये १२० च्या वर शोधनिबंध सादर करून संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे आई वडील, भाऊ बहीण, वडीलधारी नातेवाईक मित्रमंडळी यांनी कौतुक केले आहे.

# अकोला बायपास चौकात ऑटो चालकांची मनमानी, वाहतुकीची कोंडी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ डिसेंबर**



शहरालगत असलेल्या अकोला बायपास परिसरात ऑटो चालक मनमानी कारभार करीत अस्तव्यस्त ऑटो उभे करीत असून अपघाताला कारणीभूत ठरत आहेत. याकडे पोलिस विभागाने लख देण्याची गरज असल्याचे येथील रहीवाशी तसेच वाहनधारक सांगत आहेत.

येथील शिवनेरी चोकात ऑटो चालक रस्त्याच्या मधोमध ऑटो रिक्षा लावत असल्याने अपघाताचे प्रमाण वाढले आहे. यामुळे ऑटो रिक्षा चालक व प्रवासी यात कुरबुरीच्या घटना घडत आहेत. याठिकाणी पोलीस किंवा अन्य होमगार्ड राहत नाहीत याचा फायदा घेत ऑटो चालक भर रस्त्यात वाहने उभी करून अडथळा निर्माण करीत असल्याने वाहनांची कोंडी होत आहे. या भागातून अकोला, वाशिम कडून मोठ्या प्रमाणात अवजड वाहने ये-जा करीत असतात. यापुर्वीही या चौकात अनेक अपघात घडले आहेत. यासाठी बळसोंड ग्रामपंचायतच्या सरपंच, सदस्यांनी वारंवार तक्रार करूनही पुन्हा जैसे थे औटो चालक आपली वाहने भर रस्त्यात उभी करीत असल्याने येणाऱ्या, जाणाऱ्या वाहनांना याचा फटका बसत आहे. पोलीस विभागाने याकडे लक्ष देऊन कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

# मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड देणार आज गावांना भेटी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ डिसेंबर**

जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच इतर अधिकारी दि १७ डिसेंबर रोजी आठ गावांना भेटी देणार असून या ठिकाणी विविध योजनाची पाहणी करणार आहेत. यावेळी संबंधित विभागांना सूचनाही देण्यात आल्या आहेत.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता आणि मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी पदभार स्विकारल्यानंतर ग्रामीण भागातील विकास कामे आणि विविध योजनांची माहीती तसेच शाळांना अचानक भेटी देत आहेत. तसेच विकास कामांमध्ये हलगर्जीपणा करणाऱ्यांना तंबी देत असल्याचे दिसत आहेत.

हिंगोली तालुक्यातील बळसोंड, भिरडा, कलगाव, भांडेगाव, साटंबा, पांगरी, बोराळा, नांदुरा या गावांना ते दि १७ डिसेंबर रोजी भेट देणार आहेत. यावेळी पी एम सूर्यघर मुफ्त बिजली योजना, कृषी योजना, रस्ते, घरकुल आवास योजना, नरेगा कामे, पानंद रस्ते, पंतप्रधान आदर्श ग्राम योजना, दलीत वस्तीची कामे, स्वच्छ भारत, आदिवासी आश्रम शाळा, समाज कल्याण वसतीगृहे, लपा तलाव, रेशनदुकानदार तपासणी, सामाजिक अर्थसहाय्य योजना, आभाकार्ड, उमेदच्या योजना आदींची तपासणी करणार आहेत. तसेच या गावातील ल्हिा परिषद तसेच खाजगी शाळांची तपासणीही करणार आहेत. निपुण हिंगोली जिल्हा तसेच शाळा परिसर स्वच्छता, तंबाखूमुक्त शाळा आदींचीही तपासणी करण्यात येणार आहे. यासंदर्भात जिल्हा परिषदेच्यावतीने संबंधित विभागांना पत्र पाठवण्यात आले असून या वेळी तालुकांतर्गत ग्रामपंचायत येथे जिल्हा परिषदेचे संबंधित योजनेचे विभाग प्रमुख, गटविकास अधिकारी, तालुकाअंतर्गत सर्व कार्यालय प्रमुख यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहचत आहे किंवा नाही याची तपासणी तसेच गावकरी, विद्यार्थी, शिक्षक यांच्यासह महिलांशी संवाद साधणार आहेत. संबंधित यंत्रणा जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या भेटीमुळे कामाला लागली आहे.

# लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या व्याख्यानमालेला उदंड प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ डिसेंबर**




येथील श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान हिंगोली यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे व्याख्यानमालेचे पहिले पुष्प खरोखरच माणसांत समन्वय साधणारी अध्यात्मिक शक्ती निपजेल का? या विषयावर महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते कीर्तनकार भावरत्न ह भ प समाधान महाराज यांनी गुंफले.

या कार्यक्रमाच्या स्वागताध्यक्षपदी श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठानचे अध्यक्ष मेजर पंढरीनाथ घुगे, कार्यक्रमाचे अध्यक्ष हिंगोली येथील गायत्री शक्तीपिठाचे विश्वस्त विजयकुमार काबरा, व्याख्याते सुप्रसिद्ध कीर्तनकार व भावरत्न समाधान महाराज, उद्घाटक अक्षय गुट्टे सहाय्यक निबंधक सहकार खाते, प्रमुख पाहुणे नायब तहसीलदार कळमनुरी अमोल घुगे हे होते.

राष्ट्रसंत भगवान बाबा व राष्ट्रीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना मान्यवर व प्रतिष्ठानच्या पदाधिकारी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी दीप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना गायत्री शक्ती पिठाच्या विश्वस्त विजय काबरा यांनी वैचारिक वारसा जपण्यासाठी व्याख्यानमाला हे व्यासपीठ समाज प्रबोधनाचे कार्य करीत असून समता निर्माण करण्याचा प्रयत्न करून व्यासपीठ सामाजिक बांधिलकी जपत आहे असे भावना व्यक्त केल्या.

या व्याख्यानमालेतील पहिले पुष्प खरोखरच माणसांत समन्वय साधणारी आध्यात्मिक शक्ती निपजेल का? या विषयावर सविस्तर विवेचन करीत विषयाची उकल करताना महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते व कीर्तनकार भावरत्न समाधान महाराज यांनी व्याख्यानातून आई जी आपल्या मुलांना पालन पोषण करते त्या मुलांनी आयुष्यभर ऋणाची परतफेड करून आयुष्यभर आई-वडिलांची सेवा करावी, समाज सुधारायचा असेल तर कौटुंबिक संवाद आणि व्यक्ती व्यक्तीमधील जातीभेद हा संपुष्टात आला पाहिजे.व्यक्तीमध्ये मनभेद आणि मतभेदही नकोत, यासाठी प्रत्येकाने स्वतः चे विचार आणि आचरण एकसारखे असले पाहिजेत. खरा तोच एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे. त्याचप्रमाणे पसायदानातील दूरीतांचे तिमिर जावो विश्व स्वधर्म सूर्य पाहो जो जे वांछील तो ते लाहो प्राणी जात. अध्यात्मिक शक्ती निपजेल यासाठी एकांतवासात स्वतःला ओळखलं पाहिजेत, जीवन जगत असताना यशाची शिखरे गाठायची असतील तर स्वतःसर्व शक्तीने प्रयत्न करा. या विविध बाबीवर प्रकाश टाकत उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. भावनिक भाव व मार्मिक दोन्ही बाबीचा संगम या व्याख्यानात पाहायला मिळाला, अनेक वेळा भावनेत अश्रू दाटून आले तर सहज उकल करता करता विषयासोबत रसिकाला आपल्याशी समरस केले. जातिभेद समूळ नष्ट करण्याचे सामर्थ्य अध्यात्मात असल्याचे स्पष्ट केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजकुमार मोरगे प्रास्ताविक प्रा. संजय चाटे व्याख्यातेचा परिचय गजानन बांगर व आभार प्रदर्शन नितीन घुगे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री संत भगवान व प्रतिष्ठान हिंगोली यांचे पदाधिकारी ,ग्रामीण भागातील जाणते श्रोते मंडळी व शहरातील नागरिक प्रयत्न करीत आहेत.

# डॉ. मोहन यादव का अभ्युदय मध्यप्रदेश



नरेन्द्र मोदी, प्रधानमंत्री




# अभूतपूर्व अधोसंरचना विकास

## सड़क नेटवर्क- बेहतर होती कनेक्टिविटी

- वर्ष 2025-26 में 4078 कि.मी. लंबी सड़कों के निर्माण और अगले 5 वर्ष में 1 लाख कि.मी. सड़कों के निर्माण का लक्ष्य
- उज्जैन-जावरा के मध्य 4-लेन ग्रीनफील्ड एक्सेस कंट्रोल्ड हाई-वे निर्माण के लिए ₹5 हजार करोड़ से अधिक की स्वीकृति
- ₹1692 करोड़ की लागत से बनने वाले उज्जैन-इन्दौर 6-लेन मार्ग का भूमिपूजन
- ₹3589 करोड़ की लागत से भोपाल-कानपुर इकोनॉमिक कॉरिडोर को 4-लेन में अपग्रेड करने की स्वीकृति
- 6-लेन आगरा-ग्वालियर राष्ट्रीय हाई-स्पीड कॉरिडोर परियोजना स्वीकृत
- वर्तमान में ₹ 48,178 करोड़ की 73 राष्ट्रीय राजमार्ग परियोजनाएं निर्माणाधीन
- मुख्यमंत्री ग्राम सड़क योजना अंतर्गत 8565 गांव सड़कों से जुड़े
- मुख्यमंत्री मजरा-टोला सड़क योजना के तहत 20,650 छोटे गांवों में 30,900 कि.मी. पक्की सड़कें बनेंगी, जिसके लिए ₹21,630 करोड़ की स्वीकृति

## वायुसेवा और क्षेत्रीय संपर्क




- रीवा, दतिया और सतना हवाई अड्डे का लोकार्पण
- विंध्यवासियों को सौगात, रीवा-दिल्ली और रीवा-इंदौर हवाई सेवा प्रारंभ
- उज्जैन हवाई अड्डे के विकास अनुबंध पर हस्ताक्षर
- ग्वालियर से बेंगलुरु,अहमदाबाद, दिल्ली और अयोध्या के लिए वायु सेवा प्रारंभ

## रेल और मेट्रो सेवा का विस्तार



- प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी द्वारा प्रदेश के 6 अमृत स्टेशन- शाजापुर, नर्मदापुरम, कटनी साउथ, श्रीधाम, सिवनी और ओरछा का लोकार्पण
- इंदौर में मेट्रो सेवा शुरू, भोपाल में शीघ्र शुरू होगा संचालन
- इंदौर-उज्जैन के मध्य शुरू होगा मेट्रो ट्रेन संचालन
- प्रदेश में बनेगा रेल मैन्युफैक्चरिंग सेंटर, भारत अर्थ मूवर्स लिमिटेड (BEML) को सौंपा गया भूमि आबंटन पत्र। रायसेन के उमरिया में होगी स्थापना

## नवीकरणीय ऊर्जा और क्षमता वृद्धि

- मुरैना में पहली सोलर प्लस स्टोरेज परियोजना ₹ 2.70 पैसे प्रति यूनिट की दर से बिजली प्राप्त
- प्रदेश में 2000 मेगावॉट सौर पार्क व 1000 मेगावॉट कंपोजिट ऊर्जा भंडारण परियोजना स्थापित किए जाने की स्वीकृति
- ओंकारेश्वर 278 मेगावॉट फ्लोटिंग सोलर पावर प्रोजेक्ट से विद्युत उत्पादन प्रारंभ
- 880 मेगावॉट क्षमता की आगर और नीमच सौर परियोजना प्रारंभ
- बिजली उपभोक्ताओं की सुगमता के लिए समाधान योजना प्रारंभ
- उद्योगों सहित सभी गैर-कृषि उपभोक्ताओं को 24 घंटे तथा कृषि उपभोक्ताओं को प्रतिदिन औसतन 10 घंटे बिजली प्रदाय

## सिंचाई परियोजनाएं और जल संसाधन

- प्रदेश में लगभग 55 लाख हेक्टेयर क्षेत्र सिंचित। वर्ष 2025-26 तक 65 लाख हेक्टेयर और वर्ष 2028-29 तक 1 करोड़ हेक्टेयर तक सिंचाई क्षमता बढ़ाने का लक्ष्य
- प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी द्वारा देश की पहली नदी-जोड़ो केन-बेतवा लिंक परियोजना का भूमिपूजन। पार्वती-कालीसिंध-चंबल लिंक परियोजना को लेकर त्रि-पक्षीय समझौता और ताप्ती बेसिन मेगा रीचार्ज परियोजना के लिए महाराष्ट्र के साथ एमओयू
- "पर ड्रॉप मोर क्रॉप" के उद्देश्य की पूर्ति के लिए 133 वृहद एवं मध्यम प्रेशराइज्ड सूक्ष्म सिंचाई प्रणाली आधारित परियोजनाएं निर्माणाधीन
- ₹2489 करोड़ से अधिक की लागत से तराना में नर्मदा-क्षिप्रा बहुउद्देशीय माइक्रो उद्वहन सिंचाई परियोजना का लोकार्पण। इससे 100 ग्रामों की 30218 हेक्टेयर भूमि में सिंचाई सुविधा उपलब्ध होगी
- माइक्रो सिंचाई में मध्यप्रदेश देश में अग्रणी राज्य



आकल्पन : म.प्र. माध्यम/2025

मध्यप्रदेश जनसम्पर्क द्वारा जारी

# विकास और सेवा के 2 वर्ष



मध्यप्रदेश अपने बेहतर कल की बुनियाद बना रहा है, जहां सड़क, रेल, हवाई सेवा और ऊर्जा के क्षेत्र में अभूतपूर्व तरक्की हो रही है। विकसित भारत का संकल्प तीव्र विकास, उत्कृष्ट कनेक्टिविटी और पर्याप्त संसाधन से ही संभव होगा। मध्यप्रदेश प्रगति की नई तस्वीर बना रहा है।

**- डॉ. मोहन यादव**
मुख्यमंत्री, मध्यप्रदेश